# माणूस

४ एप्रिल १९७०
चाळीस पैसे

एक दो तीन ।
एक दो तीन दो एक तीन ।
चार पाँच छ ।
चार पाँच छ
पाँच चार पाँच छ ।
सात आठ नौ ।
सात आठ नौ
आठ सात आठ नौ ।
यावर गोंधळलेल्या अमलचा
प्रश्न येतो, पुढे ?
लेखक म्हणतो,
नौ–आठ–सात–छ
पाँच–चार–तीन–दो–एक ।
चाल : अर्थात मध्यमवर्गीय.

–इंद्रजित

४ एप्रिल १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक चव्वेचाळीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर । सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३०   दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे   वार्षिक वर्गणी : वीस रुपये   परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

'शिवसेना' जोर धरू लागल्याबरोबर आपली मते बदलणारे अनेक संपादक महाराष्ट्रात आहेत (पुण्यातही आता दिसू लागले आहेत) पण शिवसेनेचे वास्तव स्वरूप आपण उघडे करत आहात, ते योग्यच आहे.

महाराष्ट्राचा राष्ट्रवाद फोफावायला मदत करणारी ही सघटना आहे. जो भारतीय म्हणवून घेतो, त्याने सर्व प्रातीय पक्ष व सघटनांना विरोधच करायला पाहिजे. पण यापुढे राजकारण प्रातीय पक्षांच्या हातात राहणार आहे. तेव्हा द्र. मु. क., अकाली दल, चरणसिंग याच्या दर्जाच्या राजकारण्याचे ग्रह उच्च आहेत. मग प्रत्येक प्रात स्वायत्तता पुकारू लागला तेव्हा महाराष्ट्राने काय मागे रहायचे काय ? ठाकरे याच्या शिवसेनेला पाठिंबा जे लोक देतात त्याच्या मनात ही भीती आहे. पुढे मागे स्वतत्र राष्ट्र म्हणून कारभार हाकण्याची वेळ येईल तेव्हा अन्नधान्य, तात्रिक ज्ञान, कारखाने वगैरे सर्व बाबतीत आपला प्रांत स्वतंत्र व समर्थ राहावा, म्हणून सर्व प्रातात विशिष्ट हवा आज आहे त्या दृष्टिकोनातून शिवसेना व तत्सम विचार कितपत योग्य पावले टाकत आहेत, हे पाहणे मौजेचे आहे एक Strategy म्हणून-'महाराष्ट्र-धर्म' व भगवा झेंडा कितपत यशस्वी होत आहेत, याचे अवलोकन आपण करावेच कळवे.

मार्च २७, १९७०   मधु कुलकर्णी

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मुंबई वार्ता

महाराष्ट्र विधानसभेतील राज्यसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्र काँग्रेसमधील अतर्गत बेशिस्त आता पूर्णपणे उघडयावर आली आहे. सघटना काँग्रेसचे उमेदवार श्री. बाबुभाई चिनॉय हे निवडून येतील असे फारसे कुणाला वाटत नव्हते. पहिल्याच फेरीत त्याना सर्वात जास्त मते पडतील असे तर कुणाच्या स्वप्नातही नसेल. सघटना काँग्रेसचे विधानसभेतील बळ फक्त १३ आमदाराचे. त्याना पाठिबा अवघ्या सहा जनसघीय आमदारांचा आणि निवडून यायला कमीत कमी ४० मते तरी पडायला हवीत.

साहजिकच श्री. चिनॉय याची उमेदवारी कुणी फारशी सीरियसली घेतली नाही. केवळ उभे रहायचे म्हणून उभे राहिले एवढेच. बुधवारी सकाळी मुबईच्या कौन्सिल हॉलमध्ये मतदानाची धावपळ चालू असताना बाबूभाईंचे नाव कुणी घेत नव्हते. बाकीच्या उमेदवाराना देखील बाबूभाईंच्या तयारीची कल्पना नव्हती. 'उगाच आपल उभे रहायचे म्हणून राहिले, झालं' ही त्याची प्रतिक्रिया. मोहन धारियाचा चेहरा चिताक्रांत दिसत होता. महाराष्ट्र काँग्रेसमधला गट त्यांना पाडण्याचा जोरदार प्रयत्न करीत असल्याच्या वावडया होत्या. त्यामुळे सर्व लोक धारियाशी मोठ्या सहानुभूतीने बोलत होते. बाबूभाई एकदोनदा सहज कौन्सिल हॉलवर डोकावून गेले.

सघटना काँग्रेसचे आमदार मात्र मोठ्या आत्मविश्वासाने सागत होते. 'आमच्या उमेदवाराची चव्वेचाळीस मते पक्की आहेत. तेरा सघटना काँग्रेस, सहा जनसघ, पाच अपक्ष वगैरे आणि वीस 'इकडचे तिकडचे.' हे 'इकडचे तिकडचे' कोण? त्याच्यावर विश्वास ठेवणे कठीण जात होते. कारण काँग्रेसची, समितीची, प्रजा-समाजवाद्याची सगळी मते ठरली होती. मग 'इकडून तिकडून' मते येणार म्हणजे कुठून? ही बोलणी श्री. धारियाच्या कानावर गेली तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील चितेचे जाळे अधिकच दाट झाले. सघटना काँग्रेसचा आत्मविश्वास खरा ठरला तर धोका दोघानाच, मोहन धारिया आणि श्री. ना. ग. गोरे याना. पैकी श्री. गोरे याचा खुटा हलवून बळकट झालेला. उरलेले वादास्पद उमेदवार म्हणजे धारियाच. त्यामुळे सत्ता काँग्रेसचे इतर उमेदवार डॉ. वैशपायन, कुलकर्णी, बोवडे याना फिकीरच नव्हती.

पण जेव्हा पहिली फेरी सपली तेव्हा सगळीच गणिते चुकली. बाबूभाई चिनॉय याच्या पाठीराख्याच्या अपेक्षेपेक्षा एक मत त्याना अधिकच मिळाले. धारिया आणि बोवडेही पहिल्या फेरीतून निसटले. बाकी सर्व उमेदवार तिसऱ्या फेरीसाठी लटकून

राहिले. अगदी कॉंग्रेसचे खात्रीचे उमेदवार डॉ. वैशपायन आणि कुलकर्णीसुद्धा सपूर्ण महाराष्ट्र समितीचे बळ ४२ चे. पण त्याचे उमेदवार श्रीनिवास सरदेसाई यानासुद्धा पहिल्या फेरीत फक्त ३४ मते. कुणी कुणी पक्षशिस्त मोडावी याला धरबधच राहिला नाही. पहिल्या फेरीने सर्वांनाच धक्का दिला. सत्ताकाँग्रेसच्या आमदारांचे चेहरे पडले पण वाईट वाटले समितीच्या लोकाना. समिती फुटते काय ? कोण आपल्यातले फुटणारे ? गेल्या काही दिवसात विधानसभेतील काम-काजाच्या पद्धतीवरून समितीतील घटक पक्षाचे अतर्गत मतभेद बरेच विकोपाला गेले होते. त्याचाच तर हा परिणाम नव्हे ? की अखिल भारतीय पक्षांचे राष्ट्रीय पातळीवरील राजकारण इथेही आडवे येते आहे ? की शेतकरी कामकरी पक्षा-तलीच अतर्गत फूट इथे भोवते आहे ? समितीवाल्यांचे चेहरे चिंतातूर दिसत होते. शे. का. पक्षाच्या तरुण उत्साही आमदारांचे तर फारच. दुसऱ्या फेरीत तरी सर-देसाई निवडून येतील की नाही याची शाश्वती नव्हती.

दुसऱ्या फेरीने पुन्हा धक्का दिला. वैशंपायन पडले. गोरे, सरदेसाई आणि कुलकर्णी निवडून आले. वैशंपायन पडले ! सत्ता काँग्रेसचे बळ १९० आमदाराचे असताना फक्त तिघेच निवडून आले आणि सर्व विरोधी पक्षाचे फक्त ८० आमदार असताना त्याचेही तिघे निवडून आले. श्री. गोरे याना सत्ता काँग्रेसचा पाठिंबा होता. पण ते आपल्या चार उमेदवाराना मते देऊन उरलेल्या मताचा. त्याप्रमाणे बहुधा गोऱ्यांना मते मिळाली असतील. मग डॉ. वैशंपायनांच्या मताचे काय झाले ? डॉ. वैशंपायन मराठवाड्याचे.

इकडे जुन्या काँग्रेसचे आमदार उघड उघड सांगू लागले की आम्ही सत्ता काँग्रेसची कमीतकमी वीस मते फोडली. वीसच मते हवी होती म्हणून वीस फोडली. अधिक मते फोडायची असली तर आम्ही ती फोडू शकतो हा त्या सांगण्यामागील उद्देश.

सत्ता काँग्रेसची एवढी मते फुटतील ही कुणाची अपेक्षा नव्हती. राज्यसभेच्या निवडणुकीचे मतदान गुप्त असते. त्यामुळे निश्चित कोणती मते फुटली हे लगेच कळू शकत नाही. पण प्रत्येक उमेदवाराला कोणत्या जिल्ह्यातील आमदारानी मते द्यायची हे काँग्रेसपक्षाने ठरविलेले असते. डॉ. वैशपायनाना मराठवाड्यातील आणि काही खानदेशातील मते निश्चित केली होती. त्याना निश्चित केलेल्या ४२ मतापैकी १० मते फुटली. त्याप्रमाणे श्री. कुलकर्णी याना दक्षिण महाराष्ट्र आणि कोकणातील जिल्हे वाटून दिले होते. त्यातलीही सात मते फुटली. श्री. बोवडे यांना वाटून दिलेल्या मतातील एक फुटले. वर वर पाहता गोरे याना काँग्रेसने ठरविलेल्या मतापैकी सर्व मिळाली असे दिसते. त्याना पहिल्या फेरीत २९ मते पडली. सहा प्रजासमाजवादी, एक अपक्ष म्हणजे उरलेली बावीस काँग्रेसची. पण मग समितीची फुटलेली आठ मते कुठे गेली ?

फुटलेल्या मतांचा हिशब लावण्याची यातायात एवढयाचसाठी करायला हवी की त्यामुळे कोणकोणत्या भागातल्या कॉंग्रेसमध्ये तडे जात आहेत याचे निश्चित चित्र तयार करता येते. अफवांना वाव उरत नाही.

सत्ता कॉंग्रेसची मते फुटली याला आणखी मोठे महत्त्व आहे. सत्ता कॉंग्रेसच्या ज्या आमदारानी श्री. बाबूभाई चिनॉय याना मते दिली ते उघडपणे विधानसभेत संघटना कॉंग्रेस गटात जाऊन बसतील काय? हाच प्रश्न सर्व आमदारामध्ये मोठया हिरीरीने चर्चिला जात आहे. निवडणुकीच्या अगोदरही सत्ता कॉंग्रेसमध्ये संघटना कॉंग्रेसविषयी सहानुभूती असणारे अनेक आमदार आहेत असे जाणवत होते. पण पक्ष बदलण्याची त्यांना हिंमत होत नव्हती. आता या निवडणुकीच्या निमित्ताने तरी त्यांना अशी हिंमत होते आहे काय हे बघावे लागेल.

संघटना कॉंग्रेसच्या आमदाराना विचारले असता ते सबुरीचा सल्ला देतात. त्यांना फक्त वीसच आमदार नको आहेत. 'आम्ही आणू तर एकदम पस्तीस जणाचा गट ओढून आणू आणि सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून बसू" असे ते सांगतात.

श्री. चिनॉय याना ४५ मते पडली आहेत. समितीच्या ४२ आमदारांपेक्षा ही संख्या जास्त आहे. आताचा हा ४५ आमदाराचा गट जरी एकत्र बसला तरी तो विधानसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष ठरू शकेल. त्या दृष्टीने संघटना कॉंग्रेसची जनसंघाच्या आमदाराशी बोलणीही चालू आहेत. देशातील इतर राज्यात जनसंघाचे संघटना कॉंग्रेसशी सूत आहेच. वरच्या पातळीवर बोलणी झाल्याशिवाय हे घडणार नाही. पण तशा तऱ्हेचे प्रयत्न चालू आहेत. वरच्या पातळीवरून आदेश दिल्यानेच जनसंघाच्या आमदारानी संघटना कॉंग्रेसच्या उमेदवाराला मते दिली. बुलढाणा येथील लोकसभेच्या रिकाम्या जागेसाठी लवकरच पोटनिवडणूक होणार आहे. त्या जागेसाठी जनसघाच्या उमेदवाराला पाठिंबा द्यायचा आणि त्या बदल्यात संघटना कॉंग्रेसच्या बाबूभाई चिनॉय याना जनसघाने पाठिंबा द्यायचा एवढ्यापुरता या दोन पक्षाचा करार सध्यातरी महाराष्ट्रात मर्यादित आहे. पण पुढे मागे सध्याचे सघटना कॉंग्रेसचे १३ आमदार आणि जनसंघाचे सहा महाराष्ट्र विधानसभेत एक गट म्हणून एकत्र काम करू लागतील हे निश्चित. विधानसभेच्या या अधिवेशनात, किंवा पुढच्या पावसाळी अधिवेशनात तरी. सत्ता कॉंग्रेसचे किती आमदार केव्हा त्याच्याबरोबर बसू लागतील हे जरा अनिश्चितच आहे. एवढे मात्र खरे की सत्ता कॉंग्रेसचा लहानसा गट जरी संघटना कॉंग्रेसला येऊन मिळाला तर विधानसभेतील चित्र एकदम बदलेल. सध्या विधानसभेत २६० मध्ये १९० आमदार सत्ता कॉंग्रेसचे आहेत. या प्रचंड बहुमताच्या जोरावर सत्ता कॉंग्रेस वाटेल ते करू शकते. या मग्रूरीचे अश्लाघ्य प्रदर्शन परवा स्थानबद्धता कायदा मंजूर होण्याच्या वेळी सत्ता कॉंग्रेसने घडविले. कितीही आवाज चढविला तरी आपल्या अल्पसंख्येमुळे विरोधी पक्ष हतबल ठरले आणि सत्ता कॉंग्रेसने आपल्या प्रचंड

आवाजाच्या जोरावर विरोधकांना स्टीम रोलरप्रमाणे दाबून कायद्यावर हवी तेवढी चर्चाही घडू दिली नाही.

विरोधी पक्षीयाचे सख्यावल आणखी थोडे वाढले तर सत्ता कॉंग्रेसला जरा जपून वागावे लागेल. एवढी मग्रूरी करता येणार नाही.

परतु इकडे सपूर्ण महाराष्ट्र समितीमध्येही सशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे. अगोदरच सयुक्त समाजवादी पक्षाचे आपल्या राष्ट्रीय राजकारणाच्या सदर्भात समितीतील इतर नेत्याशी फारसे पटत नाही. त्यात आता या निवडणुकीची भर. सं. सो. पा. आमदार फुटले असा आरोप अजून कुणी उघडपणे करीत नाही. पण इतर राज्यातील सं. सो. पा. आणि सघटना कॉंग्रेस याच्यातील प्रेम सर्व-श्रुतच आहे. अशा परिस्थितीत समिती आहे त्या स्वरूपात आणखी किती दिवस टिकू शकेल हे सांगता येत नाही. नुकत्याच झालेल्या "मुबई बद" प्रकरणीही सं. सो. पा. ने समितीपासून आपला वेगळेपणा जाहीर केला होता. विधानभेतील समिती नेते आणि स. सो. पा. आमदार याच्यातील मतभेदही आता हळूहळू विकोपाला जाऊ लागले आहेत.

महाराष्ट्र विधानसभेच्या राज्यसभा निवडणुकीने काही गोष्टी मात्र स्पष्ट झाल्या. श्री. जगजीवनराम आणि इदिरा गाधी यानी श्री. गोरे यांना निवडून आणले. यशवंतराव चव्हाण यानी इदिरा गाधीना धडा म्हणून गोऱ्यांना टांग मारण्याचा प्रयत्न केला. पण आपली ताकद अजमावून त्याना या प्रकरणात काढता पाय घ्यावा लागला.

श्री. मोहन धारिया हे मूळचे इदिरा गांधीचे उमेदवार. या वेळी त्याना पाडण्याचा प्रयत्न होणार होता. धडा शिकविण्यासाठी. पण महाराष्ट्र कॉंग्रेसला हिंमत झाली नाही.

या दोन्ही प्रकरणात श्री. यशवंतराव चव्हाण यांनी आपली ताकद अजमावून पाहण्याचा प्रयत्न केला आणि दोन्ही ठिकाणी त्याना सपशेल माघार घ्यावी लागली. दिल्लीत सध्या काय वारे वाहते आहे याची त्यावरून कल्पना येईल.

श्री. वैशंपायन याचा पराभव म्हणजे देखील श्री. चव्हाणाना शह. महाराष्ट्र कॉंग्रेसची पकड सुटू लागली आहे त्याचे हे चिन्ह. उघड उघड बेशिस्ती. कॉंग्रेसमध्ये बेशिस्त फार वरच्या स्तरावरून सुरू झालेली आहे. पण ती अजून महाराष्ट्र कॉंग्रेसपर्यंत फारशी पोचली नव्हती. आता या वृत्तीचा निदान प्रवेश तरी झाला आहे. पुढे ही बेशिस्त कोणते स्वरूप धारण करते हे बघायचे.

— **वार्ताहर**

# रचनात्मक संघर्ष

परीक्षा संपल्या की शिबिराला जावयाचे, हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या जीवनात आता नित्याचा होऊ लागला आहे. मुबईच्या महाविद्यालयातील ज्यूनियर बी. ए. च्या परीक्षा आटोपल्यानंतर, गेले ८ दिवस असेच एक शिबिर बोरिवलीजवळ 'मागाठणे' या गावी झाले, व त्या शिबिराला भेट देण्याची संधी मिळाली.

हे शिबिरमात्र जरा वेगळेच होते. डामडौलापेक्षा 'काम' हे शिबिराचे घोषवाक्य होते; 'भायल्यामंगल' आदिवासी हा तर आता महाराष्ट्राचे प्रतीक बनला आहे. त्याच्याच शेतावर हे शिबिर होते; "माणूस"ने स्वावलंबनाचा मंत्र देण्यासाठी खेड्याखेड्यातून पदयात्रा काढल्या; त्याच्या पुढचे सूत्र म्हणजे हे शिबिर होय. भायल्या हा शेतकरी, राष्ट्राचा आधार, पण त्याच्या शेतावर विहीर मात्र नव्हती, निसर्गाच्या लहरीवर त्याचे भवितव्य अवलबून होते; हात असून तो परावलंबी होता; देशाचे दैन्य हे येथेच आहे. हे अचूक ओळखण्याचे काम आबानी केले आहे; (करमरकर) आणि म्हणूनच त्यानी भायल्याच्या शेतावर तळ ठोकला; गेल्या वर्षी नाताळात उत्क्रातीदलाच्या सैनिकानी विहीरचे काम सुरू केले; ५–६ फूट विहीर खोदली. आणि आता युवकानी आणखी ६ फूट विहीर खोदली; त्या विहीरला आता इतके पाणी लागले आहे, की पुढे काम करणे अशक्य ! भायल्याचे डोळेदेखील पाण्याने भरून आले आहेत; हे काम म्हणजे भायल्यावर केलेले उपकार नव्हते; तर त्याच्या ठिकाणी अधिक काम आणि कल्पकता आणून देण्यासाठी तो प्रकल्प होता; रचना होती, तसा येथे संघर्षही होता. भायल्याला आता केवळ विहीरीकडे बघत बसून चालणार नाही, तर ती विहीर बाधून द्यावी लागणार .. आणि यासाठी पैसा हवा... किमान पाच हजार रुपये... हे तो कुठून आणणार...? पण हे प्रश्नचिन्ह भायल्याच्या मागे सुशिक्षित युवक चळवळ उभी असताना कशाला राहील ? बँका तर आता रिक्षावाल्याच्या, टांगेवाल्याच्या मालकीच्या झाल्या आहेत, तर मग त्या भायल्याला तेथून पाच हजार रुपये मिळालेच पाहिजेत; युवकानी ते त्याला मिळवून दिले पाहिजेत; भायल्या तयार

## गोपाळ दुखंडे

झाला आहे; पण या युवकाचा तर निश्चय वेगळाच दिसला; विहीर बांधून आमचे काम संपले, असे म्हणावयास हे तयार नाहीत; त्यानी तर पावसाळ्यात भायल्याच्या शेतात परत येण्याचे ठरविले आहे; ते येथे येणार आहेत, आणि त्याच्या शेतातून "अधिक उत्पादन" काढून, घेतलेले कर्ज फेडण्यासाठी असते, याची जाणीव भायल्याला करुन देण्यासाठी, अधिक उत्पादनामुळे मिळालेला पैसा बँकेला परत करणार आहेत.

शिबिराच्या समारोपाला मी हजर होतो. पण माझ्या बरोबर त्या गावातील इतरही शेतकरी मंडळी उपस्थित होती. गेले आठ दिवस, ह्या तरुण-तरुणी एकत्र काम करीत असताना त्यानी पाहिले होते. भायल्याच्या शेतात आता विहीर आहे हे त्याना दिसत होते; 'अधिक उत्पादन वाढवा.' या घोषणेच्या पोस्टरपेक्षा, ह्या तरुण-तरुणीनी केलेले काम त्याच्या डोळ्यासमोर होते; आणि समारोपाच्या वेळी, त्यानी सागून टाकले या युवकाना; भायल्याच्या शेतावर काम करताना, 'मग आमच्याही शेतावर या, आम्हाला दाखवा नवीन पद्धत, आम्ही करू काम त्याप्रमाणे, . आणि येथेच त्या शिबिराला यशाची पावती मिळाली होती; हे शिबिर ह्या प्रयोगशाळेतील छोटा प्रयोग होता; तो यशस्वी झाला,... तोच प्रयोग आता व्यापक प्रमाणावर युक्राद, राष्ट्रसेवादल, यासारख्या सघटनानी हाती घ्यावयास हवा.

या शिबिराचे नेतृत्व ही कुशल सघटकाच्याच हाती होते. प्राचार्य मे. पुं. रेगे हे आता महाविद्यालयाच्या चार भिंतीतील प्राचार्य राहिलेले नाहीत; तर ते आता युवक चळवळीचे प्राचार्य झाले आहेत; मुंबई विद्यापीठाची योजना ! मग पैशाला काय तोटा ? पण प्राचार्य रेगे यानी फार मोठ्या कौशल्याने ही योजना राबवली. प्रा. गो रा. राणे, ह्याचा पिंड सघर्ष करणाऱ्या सयुक्त समाजवादी पक्षातील, पण त्यानी आता रचनेला वाहून घेतले आहे. आबा करमरकर ह्यानी तर 'रचनेतून सघर्ष' हेच जीवनाचे ध्येय ठरविले आहे.

□ □ □

रातराणी । रातराणी

विजय तेंडुलकर

# एवम् इंद्रजित

एक अधला मधला वर्ग आहे. धड वर नाही, आणि खाली म्हणावा तर खालीही नाही. वरचा वर्ग त्याला खालचा समजतो, खालचा वर्ग त्याला वरचा समजतो. हा स्वतः मात्र स्वत ला त्यातल्या त्यात वरचा मानतो. कारण हा बुद्धिजीवी असतो – असे निदान कुणीतरी केव्हातरी म्हटले ते अद्याप चालूच आहे. हा बुद्धिजीवी म्हणजे नेमका काय आहे याचा नसता विचार हा सहसा करीत नाही म्हणूनच कदाचित हे विशेषण चालू असावे. याची बुद्धी म्हणजे कारकुनी पेशाचे जन्मजात तत्त्वज्ञान. हेच याचे भांडवल. यावर हा जगतो. जगतो म्हणजे सकाळी जागा होतो, परसाकडे जातो, चहा घेतो, पेपर वाचतो, दाढी करतो, चर्चा करतो, आघोळ करतो, जमल्यास थोडा देवपूजेचा उपचार करतो; मग जेवण करतो, कचेरीत जातो, कचेरीतून परत येताना बाजार करतो, घरी जातो, पुन्हा जेवतो, उरलेला पेपर वाचतो किंवा करपट ढेकर देत शतपावली करतो, झोपतो, पुन्हा सकाळी जागा होतो. मधूनच याला किंवा कुणाला मुलगा नाहीतर मुलगी होते, हा नाहीतर कोणीतरी मरते, कुणाला प्रमोशन मिळते, कुणाला लॉटरी लागते, कोणी लाच खातो, कोणी पतप्रधान होतो, कुणाला कॅन्सर निघतो, नाहीतर कोणी बायकोशी भाडतो. याला या सगळयात रस असतो. हे सुपारीच्या खांडासारखे चघळीतच तो कारकुनी करतो. क्वचित रमी खेळतो. हे याचे जगणे. फार फार तर अश्लोल काही वाचणे नाहीतर बोलणे म्हणजे याच्या धाडसाचा कडेलोट झाला.

पण या वर्गातच एकादे संवेदनाक्षम, प्रश्न विचारणारे आणि उत्तर हवे म्हणून धडपडणारे, तडफडणारे मन निपजते. या मनाचाही त्याला इलाज नसतो. चाकोरी तोडून जगू पहाणारे हे मन चाकोरीच्या अस्तित्वाला क्षणोक्षणी आव्हान देते. वर्तुळात फिरण्याचे साफ नाकारते. उमेदी धरते. कविता करते. भरारू बघते. आणि प्रत्येक वेळी त्यात आत – आत कळते की आपण भरारण्याची आकाक्षा धरली खरी, परंतु आपल्याला तर पंखच नाहीत. आपल्या धमन्यातून वहाणारे मध्यमवर्गीय रक्त डरपोक आहे, कारकुनी आहे. त्यात क्षुज नाहीच. ते मुळातच धाडस



इंद्रजीत । सत्यदेव दुबे

नाकारते आणि दिवास्वप्नात जाऊन दडते. चाकोरीच्या वर्तुळात मुर्दाडपणे फिरत आयुष्याचा घाणा ओढणेच पत्करते. आकांक्षा, काव्य, उमेदी सर्व व्यर्थ आहेत. चाकोरी हीच आपली इतिकर्तव्यता आहे. आयुष्य झापडे लावून घाणा ओढण्यातच जाणार.

हे सर्व आयुष्याच्या उतरंडीवर उमजले तर माणूस त्याच्यापुरता तत्त्वज्ञानी होऊन विनाप्रतिकार उरलेल्या आयुष्यातून जाऊ शकतो. पण हेच समजा ऐन उमेदीतच, आयुष्याच्या ऐन मध्यावरच कळले; तर काय? तर या माणसाचा 'इंद्रजित' होतो. म्हणजे कोणी महत्त्वाचा नव्हे, जसे कोणी कमल-विमल-अमल तसा आणखी एक इंद्रजित. बस्स. एवम् इंद्रजित.


असाच एक लेखक आहे. हाही मध्यमवर्गीयच लेखक आहे. त्याला एक नाटक लिहायचे आहे. त्याला विषय हवा आहे. त्याच्या आयुष्यात तो शोध घेतो आहे. नाटके काल्पनिक आणि स्वप्नरंजनात्मक देखील असू शकतात. परंतु या लेखकाला आशयघन, वास्तवदर्शी वगैरे प्रकारचे नाटक लिहायचे आहे. त्याला सत्यदर्शन घडवायचे आहे आणि म्हणून सत्याचा शोध तो घेतो आहे. त्यासाठी तो अंतर्मुख होतो. रात्रंदिवस लिहितो, विचार करतो. त्याची एक मावशी आहे. आपला भाचा

एवढे काय लिहित असतो ते तिला विचारीला कळत नाही. ती फक्त मधून मधून त्याच्या खाण्यापिण्याची काळजी घेते. येतोस ना रे जेवायला ? केव्हाचं वाढलय' हे तिचे त्याला उद्देशून कायम पालुपद; त्याच्या सत्यशोधनात वारवार नको तिथे येऊन पोचणारे.

आणि या लेखकाच्या मनात एक तरुण स्त्री आहे – मानसी. त्याच्या मनाच्या रंगमंचावर येऊन त्याच्या कानाशी ती हळूच विचारते, 'झालं पुरं ?' 'ऊंहूं.–' तो. 'काय लिहितोस ? मला दाखव ना वाचून.' 'काही नाही, खरच काही नाही.'–तो नवा कागद चुरगळून फाडून फेकतो. ती विचारते, 'हे काय ? फाडून टाकलंस ?' 'काही लिहिलच नव्हतं तर. लिहिण्यासारखं काही आहेच कुठे माझ्यापाशी. काय लिहू ? कुणाबद्दल लिहू ?' ही मानसीदेखील मावशीसारखी वारवार येते. मावशी लेखकाच्या तहानभुकेचीच चिंता वाहते, ही मानसी त्याच्या नाटकाविषयी आत्मीयता दाखवते. मावशी हे लेखकाचे बाह्य जग आहे. मानसी हे आतरिक जग आहे. या लेखकाला बाह्य जगात अमल, कमल, विमल असल्या गणवेषासारख्या व्यक्तिमत्त्वाचे मध्यमवर्गीय नमुने भेटतात. आणि यातच त्याला भेटतो आणखी एकजण. तो नाव सागतो निर्मलकुमार. लेखक एकदम म्हणतो, 'नाही. अमल-विमल-कमल आणि निर्मल – छे छे, हे शक्य नाही ! तुझं नाव दुसरं काहीतरी असल पाहिजे. असलंच पाहिजे.' खरंखुरं साग, नाव काय तुझं ? नाव काय तुझं ? आणि जणू लेखकाच्या मनोभूमीत प्रवेश करून तो चौथा ओळख देतो, मी इद्रजित.

यानतर हा लेखक आणि हा इद्रजित नामक, लेखकाच्या जिव्हाळयाच्या परिचयाचा एक मध्यमवर्गीय, अशात, भग्नमनस्क तरुण याचे एक नाते तयार होते. यात अमल-विमल-कमल हे मध्यमवर्गीय साच्यातून निघालेले प्रातिनिधिक नमुने दुय्यम पात्रे बनतात. मावशी मध्येच 'जेवायला येतोस ना रे ? केव्हाच वाढलाय' म्हणून हाकारीत रहाते. आणि लेखकाच्या मनातली मानसी आणि इंद्रजित याच्या एका कथेला आरभ होतो. ही मानसी दर वेळी तीच आहे आणि तरी अनेकदा वेगळीही आहे. तिची वेगवेगळी रूपे मिळून पुन्हा एक मानसीच तयार होत जाते. मध्यमवर्गीय मूल्यात जन्मलेली, वाढलेली, खुरटलेली मानसी. ॠजू, कोमल, सालस. अकालवृद्धा. दुबळी. पोटात कायम एक कशाची तरी धास्ती वागवणारी. एक प्रातिनिधिक मध्यमवर्गीय मुलगी. धाडसाला कायम पारखी.

'एवम् इद्रजित' हे या दोघाच्या चिरडून जाणाऱ्या छोटया छोटया स्वप्नांचे आणि आशाआकाक्षाचे नाटक आहे. रंगमचावर वारंवार येणारा, इद्राजिताशी सवाद साधणारा आणि लेखनाचे वाझ प्रयत्न करणारा लेखक हा म्हटला तर इंद्रजितच्या आयुष्याचा प्रेक्षक आणि समालोचक आहे. याहूनही अधिक तो 'एवम् इंद्रजित' या नाटकाचा सूत्रधार आणि खुद्द लेखक बादल सरकार आहे.



# घडीघडीला जमते रंगत, कोका-कोलाची जर संगत

खेळ म्हणजे मौजच मौज! खेळाडूंच्या अंगात हौस आणि उत्साह कसे नाचत असतात. त्यात कोका-कोलाची भर...मग काय, दुधात साखर! कोका-कोलाचा स्वाद असा रुचकर नि उत्साहदायक असतो की, पुन्हा पुन्हा कोका-कोलाच प्यावासा वाटतो. जगभर कुठेहि पहा, केव्हाहि पहा, कोका-कोला पिणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. वाहवा! कोका-कोला, अशी लज्जत एरवी कुठून मिळणार!

Enjoy Coca-Cola

बादल सरकार या नाटकात कलकत्त्याच्या मध्यमवर्गीय अनुभवविश्वाविषयीच बोलतात. कलकत्त्याचे किती तरी उल्लेख या नाटकात आहेत. परंतु नाटकातले मध्यमवर्गीय विश्व कलकत्त्याच्या मर्यादा ओलाडून दिल्ली–मुबईपर्यंत सहज पोचते. प्रत्येक मध्यमवर्गीय सुजाण माणसाला ते त्याच्या आयुष्याची भेदक ओळख घडवते. या आयुष्यातली चाकोरीबद्धता, छोटचा छोटचा आकाक्षा. पोटातला भयगंड, प्रवाहपतित वृत्ती, पोकळ मूल्याचा रक्तात मुरलेला बाऊ इत्यादी वैशिष्टचे कमी अधिक प्रमाणात प्रत्येक पाढरपेशाची ठरतात उम्द पुरती सरण्याआत इद्रजित नामक सवेदनाक्षम तरुणाला आपल्या मध्यमवर्गीय नियतीपुढे पत्करावी लागलेली संपूर्ण हार आणि सर्व प्रतिकार टाकून त्याने केलेला या नियतीचा स्वीकार हा या पांढरपेशा जगाच्या भविष्याविषयी लेखकाने नमूद केलेला शेराच मानता येईल.

वस्तुतः अशी नियतीशरणता अथवा वस्तुनिष्ठपणे नियतीचा डोळस स्वीकार हा एकूण मनुष्यजातीच्या सदर्भातच पाश्चात्य लेखकाचा आजचा आवडता विषय आहे. त्याच्या दृष्टिकोणात याविषयी अनुकपा, स्वप्नाळू भावविवशता अगर हळहळ असत नाही. वास्तव म्हणून याचा ते बिनशर्त स्वीकार करू पाहतात. पाश्चात्य नाटचक्षेत्रात साम्युएल बेकेट हे या पंथाचे नाटककार म्हणता येतील. एकूण मनुष्यजातीलाच भवितव्य नाही. आणि मानवी आयुष्याचीच एक रंगहीन, रूपहीन अशी शोकांतिका झाली आहे व तिला शेवट नाही असे ते मानतात. या आयुष्याचा तोचतोचपणा, गतिहीनता, निरर्थकता व्यक्त करण्यासाठी बेकेट आणि त्या पंथाचे इतर नाटककार ज्या तांत्रिक क्लृप्त्या योजतात त्यातील अनेक बादल सरकार यानी या ' एवम् इंद्रजित 'मध्ये मध्यमवर्गीय विश्वाचे चित्रण करताना वापरल्या आहेत. बेकेट आणि इतर नवे पाश्चात्त्य नाटककार एकूण मनुष्यजातीविषयी बोलतात; बादल सरकार याचे विश्व मध्यमवर्गीय जीवनापुरते मर्यादित आहे आणि या मर्यादेतच ते आयुष्याच्या त्याचत्यापणाविषयी, निरर्थकतेविषयी लिहितात. असे लिहितानाही त्यांचा मध्यमवर्गीय पिंड ते सोडीत नाहीत.

आपले अढळ मध्यमवर्गीय भविष्य व्यक्त करताना मानसीपाशी इंद्रजित तगमगून म्हणतो, जीवन. जिथ विराट प्रश्नांची उत्तर नसतात तिथे छोटचा छोटचा अर्थहीन समस्यांचा रवथ करीत जगण. एक अर्थशून्य ढोग, देखावा–कशासाठी पण ? काही जरूर नाही. नसला तरी काही बिघडणार नाही. पण नाही, ' जगला पाहिजे, केला पाहिजे कारण हेच जगण आहे, माणसाच जगण. आणि मी करोडो, कोटचा-वधी माणसांच्यातला एक आहे. माझ्या जगण्याची अर्थशून्यता सगळचा कोटचावधी माणसांच्या जगण्याची अर्थशून्यता आहे. मानसी त्याला सभय विचारते; काय करायच मनात आहे तुझ्या, इद्र ? काय करणार आहेस ? इद्र–हा आजचा मध्यम-वर्गीय पाढरपेशा इंद्र–म्हणतो, काय करणार ? मी काय करणार ? मरेपर्यंत थकून ठार झोपून राहीन. नाहीतर...नाहीतर सगळं हसण्यावारी नेऊ शकेन !...मला

वाटतं हसण्यावारी नेणच योग्य होईल. हे सालं जगणंच इतक तुफान हास्यास्पद आहे की न हसण्याचे प्रयत्नच व्यर्थ आहेत. इद्रजित एकदम सगळी शक्ती एकवटून उभा राहतो. मानसी आणि तो दोन विरुद्ध दिशाना निघून जातात. अमल-विमल-कमल आपापसात कशालातरी खुळ्यासारखे खो खो. हसत राहतात. थाबत नाहीत इथे लेखक येऊन जणू प्रेक्षकच हसताहेत अशा अर्थी दोन्ही हात उभारून त्याना शात करू लागतो अमल-विमल-कमल हे सामान्याचे प्रतिनिधी आपल्या हास्या-सकट निघून जातात. लेखक प्रेक्षकाना म्हणतो, आपण असे हसू नका, हवे तर हात जोडतो. पण शात व्हा. असे नका रे हसू ! मान्य, माझ्याकडून नाटक नाही लिहून होत आहे पण प्रयत्नाची किती पराकाष्ठा करतोय मी पाहता आहा ना आपण. अमल-विमल-कमलच नाटक ? आणि इद्रजितच ! इथे लेखकाची मावशी मध्येच प्रवेशून तिचा हातखंडा प्रश्न करते, जेवायला येतोस ना रे ? केव्हाचं वाढलाय—या जागी हा नकोसा प्रश्न—जेवणासारख्या प्राथमिक गोष्टीचा—उपस्थित करून मावशी निघून जाते आणि मानसी लेखकाकडे येऊन पोचते. मानसी हळूवार-पणे विचारते, जेवायला जातोस ना ! लेखक तगमगून तिला विचारतो, मानसी, तूसुद्धा ? मानसी प्रश्न सुधारून घेऊत म्हणते, चुकले. लिहितोस ना ? लेखक म्हणतो, कसा लिहू, मानसी ? इद्रजित गेला तो परत नाही येत आहे. तीन वर्षात त्याने मला फक्त तीन पत्र लिहिली. तीन्ही पत्रात तोच मजकूर. मी भटकतो आहे, भटकतो आहे पण अद्याप मेलेला नाही. चित्रविचित्र स्वप्नं मनात फिरत राहतात. काही केल्या मरत नाहीत. लेखक हे सागून मानसीला विचारतो, साग, या जीवनाचं सत्य रूप ज्याला कळतय आणि जो त्याला स्वप्नच समजतो आहे त्याला घेऊन नाटक कस लिहू ?

आजच्या मध्यमवर्गीय संवेदनाक्षम माणसाच्या समस्येचे याहून प्रभावी दर्शन कोणते असेल ? या जोडीला अमल-कमल-विमलची ही बधिर अवस्था :

एका टेबलाशी बसून तिघे पत्ते खेळत आहेत.

अमल : (पान टाकून) १९४७ च्या १४ ऑगस्टला भारत स्वतंत्र झाला.

विमल : (पान टाकून) ब्रिटिश साम्राज्यवादाच्या जोखडापासून आम्ही मुक्त झालो.

कमल : (पान टाकून) आता एक स्वावलबी, स्वयपूर्ण समाजाच्या उभारणी-साठी आपल्याला कमरा कसल्या पाहिजेत.

अमल : (हात गोळा करून बाजूला ठेवीत) भाडवलशाही अर्थव्यवस्थेला नष्ट होण्यावाचून गत्यतर नाही.

विमल : (पान टाकून) फॅसिझम समाजाला विनाशाकडे नेतो.

कमल : (पान टाकून) कम्युनिझम माणसाचं व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेतो.

अमल : (पान टाकून) लोकशाहीत झटपट प्रगती होऊ शकत नाही.

विमल : (हात गोळा करून बाजूला ठेवीत) हुकूमशाही प्रत्येक देशात, प्रत्येक काळात शाप ठरली आहे.

कमल : (पान टाकून) कुठल्याही व्यवस्थेत जनता दुःखीच राहणार.

अमल : (पान टाकून) सगळचा देशात अदाधुंदी आणि अन्यायाच साम्राज्य आहे.

विमल : (पान टाकून) या सरकारच्या हातून काही होणार नाही.

कमल : (हात गोळा करून बाजूला ठेवीत) खर्चीवर बसले की सगळे सारखेच. सगळे एका माळेचे मणी.

अमल : (पान टाकून) राजकारण मोठ गलिच्छ झालं आहे.

विमल : (पान टाकून) काय उपयोग. आपला आवाज म्हणजे या गदारोळात पिपाणीसारखा.

सर्वसाधारण मध्यमवर्गीय समाजाच्या सुखासीन न-कर्तेपणाचा, वातड अश्रद्ध वृत्तींचा, बधिर जगण्याचा हा रंगमंचावरचा भेदक प्रत्यय अधिक इंद्रजित आणि लेखकासारख्या सवेदनाक्षम मध्यमवर्गीयांची न सुटणारी आंतरिक समस्या असे मिळून हे इंद्रजितचे—'आणि एक इंद्रजित'चे नाटक विणले जाते. एका अर्थाने हे घतिहीन आहे. यात जे घडते ते फार मामुली आहे, न घडण्यासारखे आहे. लेखकाच्या मनोभूमीवरचे वाद-संवाद हेच या नाटकाचे रूप आहे. तरीही या वादसंवादांसकट मध्यमवर्गीय हळवेपणा आणि काव्यात्मता प्रसंगी मुक्तछंदाच्या स्वरूपात वागवीत हे नाटक सुमारे दोन तास सामान्य प्रेक्षकालाही बांधून ठेवते याचे श्रेय बादल सरकार यांच्या प्रतिभेला आणि बेकेट आदि पाश्चात्त्य नाटककारांनी आपल्या अर्थशून्यतावादी नाटचरचनेत वापरून यशस्वी केलेल्या अनेक तांत्रिक क्लृप्त्यांना आहे. या क्लृप्त्या बादल सरकार यानी कल्पकतेने आणि फार जपून येथे वापरल्या आहेत. वर दिलेला अमल-कमल-विमल याचा पत्ते खेळतानाचा छोटा प्रवेश हे पाश्चात्त्य प्रति-नाटचवादी पंथातले तंत्र आपल्या विषयाशी बादल सरकार यांनी बेमालूम जोडून घेतल्याचे एक चागले उदाहरण म्हणता येईल. याचा परिणाम या नाटकात एकजीव व एकसंध घडतो हे महत्त्वाचे अत्याधुनिक साधने घेऊन बादल सरकार घडवतात ती मूर्ती येथली आहे, या मातीतली आहे, ती फार भव्य नाही, मध्यमवर्गापुरताच तिचा आकार सीमित राहतो तरीही ती महत्त्वाची आहे.

या मूळच्या बंगाली मातीच्या मूर्तीला दिल्लीच्या 'दिशातर' संस्थेच्या हिंदी नाटकवाल्यानी तिला आपल्या पद्धतीने सजवले आहे. मुबईच्या गुजराती नाटक-वाल्यांनी तिचे हास्यप्रधान नाटक केले, दिल्लीच्या निर्मात्यानी तिची दारुण शोकात्मिका करण्यासाठी स्वातंत्र्य घेऊन इद्रजितला लेखकाहातून ठार केले, कलकत्त्याच्या बगाली रंगमचावर तिचे उभे राहिलेले रूप त्याच शहरात हिंदी नाटघसंस्थेने तिला दिले त्या रूपाहून कितीतरी भिन्न होते मुबईत आता थिएटर युनिटने सादर केलेल्या 'एवम् इद्रजित'ला भावनिक सामर्थ्य अधिक आहे, सर्व-

साधारण मध्यमवर्गीय प्रवृत्तीचे चित्रण खुळे (ॲब्सर्ड) इथे कांहीसे कमी दाहक आणि दुय्यम ठरले आहे.. मूळ नाटकाचे तीन अंक एकत्र करून त्याला कुठे कुठे कात्रीही लावण्यात आली आहे. गंमत ही की अशा वेगवेळ्या संस्कारातूनही या नाटकाची मूर्ती दर वेळी उभी रहाते ती वेधक असते, सच्ची असते

थिएटर युनिटच्या हिंदी प्रयोगात नेपथ्य केवळ काळ्या पडद्याचे आणि मोजक्याच वस्तूंचे होते. या वस्तूना रंगमचावर अनेक अपरिहार्य उपयोग होते. अनावश्यक, अवजड असे काहीही रगमचावर नव्हते. रंगमंच प्रकाशयोजनेद्वारे निखळ अधारानेच सजला आणि भरला होता. प्रकाशाचे अधुक आणि भगभगीत झोत या रंगमंचावर पात्राप्रमाणे सतत वावरत होते आणि या झोतात पात्रे काही वेळा शिस्तबद्ध यात्रिकपणे तर काही वेळा आपली तडफड तगमग मुक्तपणे व्यक्त करीत वावरली. लेखक झाले होते अमरीश पुरी. इद्रजित होते · दिग्दर्शक सत्यदेव दुबे. मानसीची भूमिका सुलभा देशपाडे यानी केली. मावशी होत्या श्रीमती मुर्डेश्वर आणि अमल-कमल-विमल ही मध्यमवर्गीय त्रिमूर्ती गजानन बगेरा, व्ही. ए. नायक आणि चद्रशेखर शेणॉय यानी रंगमंचावर उभी केली. पहिले तिघे मुबईच्या हिंदी रंगभूमीवरचे कसलेले कलावंत आहेत. नाटकाचा गाभा त्यानी अचूक धरला व उत्कटपणे व्यक्त केला. नतरचे चौघे नाटककार व दिग्दर्शकाहातची कळसूत्री बाहुली आहेत कारण मुळात त्याच्या भूमिकाना स्वतत्र त्रिमिती– अस्तित्वे नाहीत. ते केवळ प्रातिनिधिक ' नमुने ' म्हणूनच उरतात. थिएटर युनिटच्या प्रयोगात हा भाग–– नाटकातील गतीचा आणि चटपटीत भाग— काहीसा कमी गतिमान आणि चटपटीत राहिला. ओक्याबोक्या, अधार-मडित ' जड ' रगमंचावर या पात्रानी केलेले वर वर हास्यास्पद आणि हास्यकारक ' बिझिनेस ' चागले कल्पिले असूनही नाटकातील गतीची आणि ' रिलीफ 'ची तात्रिक गरज भागवू शकले नाहीत. परिणामी हे नाटक या प्रयोगात अधिक गडद आणि संथ वाटले. पर्यायाने ते अधिक अस्वस्थ करणारेही ठरले. शेवटी लक्षात राहिली नाटकातला लेखक म्हणतो मी इद्रजित आणि त्याच्या मध्यमवर्गाचे वर्णन करणारी ' कविता ' :

एक दो तीन
एक दो तीन दो एक तीन
चार पाँच छ
चार पाँच छ पाँच चार पाँच छ
सात आठ नौ
सात आठ नौ आठ सात आठ नौ

यावर गोंधळलेल्या अमलचा प्रश्न येतो, पुढे ? लेखक म्हणतो,

नौ–आठ–सात–छ–पांच–चार–तीन–दोन–एक.

चाल : अर्थात् मध्यमवर्गीय. ◘ ◘ ◘

काश्मीर, हरियानाच्या निमित्ताने

# आपल्या लोकशाहीतील अनिष्ट प्रवृत्ती

**वा. दा. रानडे**

काश्मीर व हरियाना या दोन्ही राज्यात पतप्रधान श्रीमती गाधीच्या गटाचे मुख्यमत्री अधिकारावर आहेत. काही सभासद फुटल्यामुळे विधानसभेत त्याचे बहुमत गमावण्याचा व त्याची सरकारे गडगडण्याचा धोका निर्माण झाला, तेव्हा ती सावरण्यासाठी दोन्ही राज्याच्या मुख्यमत्र्यांनी विधिमडळाचे अधिवेशन संपविण्याचा सल्ला राज्यपालाना दिला व दोन्ही राज्यपालानी तो मानला. इदिरा-गटाच्या बाजूची सरकारे टिकविण्यासाठी केलेले हे सरळ लोकशाहीविरोधी वर्तन होते.

काश्मीरमधील घडामोडी तर अगदी नुकत्याच घडलेल्या आहेत. विधानसभेच्या ७१ सभासदापैकी कॉंग्रेसचे ६१ आहेत. कॉंग्रेस पक्षात मुख्यमत्री सादिक विरुद्ध सय्यद मीर कासीम याच्या गटातील सघर्ष गेले एक दीड वर्ष धुमसत आहे विधान-सभेच्या ३५ कॉंग्रेस आमदारानी सादिक यांना पाठिबा काढून घेतल्याचे निवेदन पक्षाचे मुख्य प्रतोद गुलाम महमद मीर यानी १२ मार्चला केले. त्यानतर दुसऱ्याच दिवशी काश्मीर विधिमडळाच्या दोन्ही सभागृहाची बैठक मुख्यमंत्री सादिक याच्या सल्ल्यानुसार राज्यपालानी बेमुदत तहकूब केली. जम्मूमध्ये काही गटानी चालविलेल्या चळवळीमुळे विधिमडळाचे कामकाज चालविण्यास वातावरण अनुकूल नाही असे कारण सादिक यानी वरकरणी दिले; पण खरे कारण बहुसख्य सभासद आपल्या विरुद्ध उलटल्याने आपले गडगडणारे मुख्यमंत्रिपद व सरकार सावरण्यासाठी त्याना अवधी होता. विधानसभेत आपल्यामागे बहुमत आहे असा दावा त्यानी वरकरणी माडला खरा पण तो खरा नव्हता. कारण बहुसख्य सभासदाचा आपणास पाठिबा आहे अशी त्याची खरोखरच खात्री असती तर एवढ्या तडकाफडकी विधिमडळाचे अधिवेशन बेमुदत तहकूब करण्याचा सल्ला त्यानी राज्यपालाना दिलाच नसता.

बिहार, उत्तर प्रदेश व पश्चिम बंगालच्या निमित्ताने आपल्या लोकशाहीतील काही अनिष्ट प्रवृत्तीचे विवेचन आतापर्यंत तीन लेखांमध्ये (माणूस ७, २१ व २८ मार्च १९७०) लेखकाने केले. काश्मीर व हरियानाच्या निमित्ताने आणखी काही अनिष्ट प्रवृत्तीचे हे दिग्दर्शन--

## राज्यपाल केवळ रबरी शिक्के

मुख्यमंत्र्यांचा सल्ला राज्यपालानी सर्वसाधारणपणे मानला पाहिजे हे खरे, पण बहुमत गमावल्याने आपले गडगडणारे सरकार वाचविण्यासाठी विधिमंडळाची बैठक बेमुदत स्थगित करण्याचा सल्ला मुख्यमंत्र्यानी दिला तर तो राज्यपालानी मानावा काय हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. घटनेतील तरतुदीचा अर्थ लोकशाहीची पायमल्ली करण्याच्या दृष्टीने नव्हे तर ती टिकविण्याच्या दृष्टीने लावला गेला पाहिजे. काश्मीरचे मुख्यमंत्री व राज्यपाल याच्या निर्णयाचा या कसोटीवरच विचार केला पाहिजे. लोकसभेत गृहमंत्री यशवतराव चव्हाणानी राज्यपालाच्या निर्णयाचे जे समर्थन केले त्यामुळे त्याच्या पक्षातल्याही सभासदाचे समाधान झाले नाही. काश्मीरच्या घटनेच्या कलम ३५ (२) अन्वये मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानुसारच राज्यपालाना वागावे लागते असे चव्हाणानी सागितले चव्हाणानी घटनेचा आपल्याला अनुकूल अर्थ लावण्यासाठी सोयीचे कलम निवडले; पण प्रश्न राज्यपालानी विधिमंडळाचे अधिवेशन सपविण्याच्या अधिकारासबधीचा आहे. याबाबतीत काश्मीरच्या घटनेचे कलम ५३ विचारात घेतले पाहिजे याकडे काही खासदारानी लक्ष वेधले. या कलमात 'शॅल' शब्द वापरलेला नसून 'मे' शब्द वापरला आहे. याचा अर्थ मुख्यमंत्र्याचा सल्ला राज्यपालानी मानलाच पाहिजे असे नाही. त्याना वाटल्यास या बाबतीत स्वत चा निर्णयाधिकार वापरण्याचा अधिकार आहे. हा निर्णयाधिकार वापरताना राज्यपालापुढे मुख्य विचार लोकशाहीच्या रक्षणाचा असला पाहिजे. विधिमंडळाची बैठक बेमुदत स्थगित करण्याचा सल्ला मुख्यमंत्री सादिक यानी दिला तेव्हा त्याच्यामागे बहुमत होते काय ? की विधानसभेत आपला पराभव होऊन सरकार गडगडण्याचा सभव होता ते टाळण्यासाठी त्यानी हा सल्ला दिला ? विधिमंडळाची बैठक बेमुदत स्थगित करण्यासाठी त्यानी दिलेली कारणे वितपत समर्थनीय आहेत ? या सर्व गोष्टीचा विचार राज्य-

पालानी लोकशाहीचे रक्षण हाच निकष पुढे ठेवून केला असता तर सादिक यांचा लोकशाहीविरोधी सल्ला त्यानी मानला नसता गडगडण्याच्या मार्गावर असलेल्या आपल्या मन्त्रिमडळाला वाचविण्यासाठी विधिमंडळाची बैठकच बेमुदत तहकूब करण्याचा सल्ला मुख्यमत्री सादिक यानी दिला ही पहिली चूक आणि राज्यपालानी तो मानला ही दुसरी चूक. 'या चुकाचे समर्थन करून चव्हाण घातक पायडयाना उत्तेजन देत आहेत. अशा कसोटीच्या प्रसगी राज्यपालानी केवळ 'रबरी शिक्के' बनता कामा नये' अशी टीका नाथ पै यानी केली.

## हरियानामधील घटना

काश्मीरमध्ये जे घडले त्याच स्वरूपाच्या घटना हरियानामध्ये फेब्रुवारी अखेर घडल्या. काही सभासद फुटल्यामुळे इदिरा गटाच्या बन्सीलाल मन्त्रिमडळाचे बहुमत गमावले होते किंवा गमावण्याच्या मार्गावर होते. ते सरकार सावरण्यासाठी विधानसभेचे अधिवेशन सपवून राज्यपालानी तेथे लोकशाहीची पायमल्ली केली.

हरियानाचे माजी काँग्रेस मुख्यमत्री भगवतदयाल शर्मा याचा गट फुटल्यापासूनच बन्सीलाल याचे आसन डळमळीत झाले होते. फुटलेल्यापैकी काही सभासदाना पुन. आपल्या गटात ओढून मन्त्रिमडळात वाढ करून, निरनिराळ्या अधिकारपदाची अमिषे दाखवून बन्सीलाल यानी आपले आसन कसेतरी सावरले होते, पण अदाजपत्रकी अधिवेशन कसे निभवून न्यावयाचे हा त्याच्यापुढे मोठा पेच होता.

सत्तावीस फेब्रुवारी उजाडला. रणबीरसिग याच्या नेतृत्वाखाली काँग्रेस आमदाराच्या एका गटाने पक्षातून फुटून बन्सीलाल मन्त्रिमडळ पाडण्याचे ठरविले आहे अशा बातम्या शहरात पसरल्या होत्या. बन्सीलाल गटाच्या नेत्यानी रात्रभर धावपळ केली. जे सभासद फुटणार असा सशय होता त्याची व विरोधी पक्षाच्या नेत्याची गाठच पडणार नाही अशी व्यवस्था त्यानी केली. चार काँग्रेस आमदाराना अज्ञात ठिकाणी नेऊन ठेवले. विरोधी पक्षाना त्याच्याशी सपर्कच साधता आला नाही. बाकीच्या आमदारापैकीही कोणी फुटू नये, विरोधी आमदाराशी त्याची कोठे गाठही पडू नये यासाठी पंधरा मोटारीचे ताफ्यातून सर्व काँग्रेस आमदाराना एकदमच विधानसभा सभागृहात आणण्यात आले.

विधानसभेत बन्सीलाल मन्त्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडण्यात आला. सभापतीनी तो दाखल करून घेतला व त्याच्या चर्चेसाठी तीन मार्च ही तारीखही ठरविली. पण यानतर काही मिनिटातच विधानसभेचे अधिवेशन बेमुदत तहकूब करण्याचा ठराव मुख्यमत्री बन्सीलाल यानी माडला व आवाजी मतदानाने तो पासही झाला. ठरलेल्या कार्यक्रमानुसार विधानसभेची बैठक वास्तविक आणखी पाच दिवसानी सपावयाची होती, मग ती पाच दिवस आधीं संपविण्याचा ठराव

मख्यमंत्र्यांनी मांडावा अशी काय आणीबाणी अचानक उद्‌भवली होती ? चंदीगड निर्णयावरची चळवळ शमली होती. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने राज्यात कोणतीही आणीबाणीची परिस्थिती नव्हती. आणीबाणीची स्थिती होती ती बन्सीलाल मंत्रिमंडळाची. आदल्या रात्री धावपळ करून २७ फेब्रुवारीस आपल्या मागे बहुमत राहील अशी व्यवस्था बन्सीलाल यानी केली होती खरी. पण ती त्या दिवसापुरती होती. गयाराम केव्हा फुटतील व दगा देतील याचा नेम नव्हता. अविश्वासाचा ठराव तर सभापतीनी दाखल करून घेऊन त्याच्या चर्चेची तारीखही ठरविली होती. अशा परिस्थितीत पराभवाची नामुष्की कशी टाळावयाची व सरकार कसे वाचवायचे ? विधानसभेची बैठक बेमुदत तहकूब करणे हे एकच हुकमाचे पान बन्सीलाल याच्या हाती होते ते वापरून त्यानी डाव जिंकला. पण हा डाव जिंकताना लोकशाही पायदळी तुडविली जात आहे याची खंतही त्यांना किंवा इतर कोणा काँग्रेस नेत्यास वाटलेली दिसली नाही. कशी वाटणार ? कारण लोकशाहीचा तोडाने कितीही उदोउदो केला तरी लोकशाही मूल्याची चाड त्यांना खरोखर नव्हती. काहीही करून आपली सत्ता टिकविणे हेच त्याचे एकमेव उद्दिष्ट होते.

## उद्याच्या घटनांची नांदी

बिहार व उत्तर प्रदेश सबधी लिहिताना तेथील घडामोडी म्हणजे उद्याच्या राजकारणाची नादी आहे असे मी म्हटले होते. काश्मीर व हरियानातील घटनां-संबंधीही तसेच म्हणता येईल. गडगडणारी सरकारे सावरण्यासाठी विधिमंडळाची अधिवेशनेच बेमुदत स्थगित करण्याचा अनिष्ट लोकशाहीविरोधी पायंडा या दोन राज्यात पाडण्यात आला. केंद्रात उद्या इदिरा गांधी सरकार सावरण्यासाठी याच मार्गाचा अवलब केला जाणार नाही कशावरून अशी शंका येणे अगदी स्वाभाविक आहे. कारण काँग्रेसमधील फुटीनंतर इदिरा गांधीमागे पक्षाचे निर्विवाद बहुमत राहिलेले नाही. दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, द्रवीड मुन्नेत्र कळघम व काही अपक्ष सभासद याच्या पाठिंब्यावरच त्या आपले सरकार टिकवून आहेत. काही कारणानी हा पाठिंबा गमावला तर आपला पराभव टाळून सरकार वाचविण्यासाठी इदिरा गाधीही पार्लमेंटची बैठक बेमुदत स्थगित करण्याचा सल्ला राष्ट्रपतीना देण्याचा व राष्ट्रपती हा सल्ला मानण्याचा सभव आहे. लोकसभेत काश्मीरवरील चर्चेच्या वेळी श्री. स. का. पाटील यानी ही शका बोलूनही दाखविली. ते म्हणाले, 'अशा आणीबाणीच्या परिस्थितीची कल्पना करा की पतप्रधानाना आपल्यामागे बहुमत नाही हे माहीत असून पार्लमेंटचे अधिवेशन संपविण्याचा सल्ला त्यानी राष्ट्रपतींना दिला. हा सल्ला मानलाच पाहिजे असे बंधन राष्ट्रपतीवर आहे का ?' आपल्या घटनेत राष्ट्रपतीचे स्थान इंग्लंडच्या राजासारखे आहे. ते केवळ घटनात्मक प्रमुख असून खरी सत्ता पंतप्रधानांच्या हाती आहे. राष्ट्रपतींनी पंतप्रधानांच्या सल्ल्या-

नुसारच वागले पाहिजे असा युक्तिवाद त्यावेळी केला जाण्याचा संभव आहे. घटनेच्या कलमांचा काटेकोर अर्थ लावून अशा अनिष्ट लोकशाहीविरोधी पायंड्यांचे समर्थन करता येईलही. पण असे पायडे पडू द्यावयाचे काय हा खरा प्रश्न आहे.

लोकशाहीची गळचेपी होऊ द्यावयाची नसेल तर असे अनिष्ट पायंडे वेळीच थांबविले पाहिजेत. लोकशाही मानणाऱ्या सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यानी, विचारवतांनी व घटनापडितानी एकत्र येऊन काही सर्वमान्य सकेत ठरविले पाहिजेत. या बाबतीत पहिली जबाबदारी सधिसाधु पक्षपालट करणाऱ्या 'आयाराम गयाराम' सभासदांबाबत कडक धोरण स्वीकारण्याची पक्षातराला उत्तेजन मत्रिपदाची आमिषे दाखवून राजकीय पक्षाचे नेतेच देत असतात स्वत: सत्तेवर येण्यासाठी अधिकारारूढ पक्षाचे सभासद आमिषे दाखवून फोडण्याचे राजकारण त्यानी प्रथम थावविले पाहिजे. पक्षातर करणाऱ्या गटास! विरोधी पक्षाच्या आघाडीत एकदम प्रवेश मिळतो एवढेच नव्हे तर त्याच्या नेत्यास मुख्यमत्रिपदही बहाल केले जाते. पक्षांतराची साथ यामुळेच फोफावली. तिला आळा घालावयाचा असेल तर पक्षातर करणाराने लागलीच विधानसभा सभासदत्वाचा राजिनामा देऊन नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आले पाहिजे. अशी सक्ती लोकप्रतिधित्वाच्या कायद्यानेच केली पाहिजे. कायद्यापेक्षा सकेताने अशा गोष्टी झाल्या तर अधिक चागले. पण प्रत्यक्षात त्या होत नाहीत असा अनुभव आहे.

पक्षांतर करणाऱ्या सभासदास किमान एक वर्ष नव्या पक्षात कोणतेही महत्त्वाचे अधिकारपद मिळता कामा नये असा सकेत सर्व राजकीय पक्षानी कटाक्षाने पाळला पाहिजे. याबाबतीत कायदा करता येणार नाही. ही गोष्ट सकेतावरच सोपवावी लागेल. हा सकेत पक्षानाच नव्हे तर सयुक्त आघाड्यानाही लागू केला पाहिजे.

## केरळच्या मुख्यमंत्र्यांचा आदर्श

एवढेही करून अधिकारारूढ पक्षातील काही सभासद फुटल्याने विधानसभेत पराभव होण्याचा व मत्रिमडळ गडगडण्याचा धोका निर्माण झाला तर मुख्यमत्र्यानी त्या परिस्थितीला धैर्याने तोड दिले पाहिजे. काश्मीर व हरियानाचे मुख्यमत्र्यांप्रमाणे विधिमडळाची बैठक बेमुदत स्थगित करण्याचा सल्ला देऊन आपले गडगडणारे मत्रिमडळ सावरण्याचा लोकशाही विरोधी मार्ग त्यानी अवलंबू नये. याबाबत केरळच्या मुख्यमत्र्यानी फार चागली प्रथा पाडली आहे. अधिकारारूढ आघाडीस पाठिंबा देणारे पाच सभासद फुटल्याची बातमी येताच त्यांनाही आपले सरकार सावरण्यासाठी विधिमंडळाची बैठक बेमुदत स्थगित करण्याचा सल्ला राज्यपालांना देता आला असता; पण मुख्यमंत्री सी. अच्युत मेनन यानी तसे न करता दुसऱ्याच दिवशी विधानसभेत स्वत.च विश्वासाचा ठराव मांडून सभासदाना आश्चर्याचा धक्का दिला. अशा कसोटीच्या प्रसंगी मुख्यमत्र्यानी कसे वागावे याचा

अनुकरणीय आदर्शच मेनन यानी आपल्या उदाहरणाने घालून दिला आहे, असा आदर्श घालून देणारे मेनन हे काही पहिलेच मुख्यमंत्री नाहीत हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. याबाबतीत पहिला मान त्रावणकोर–कोचीनचे माजी कॉंग्रेस मुख्यमंत्री जॉन यांचा आहे. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर त्रावणकोर–तामिळनाड कॉंग्रेस सभासदाच्या गटाच्या पाठिंब्याने कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आले होते. पण या गटाने पाठिंबा काढून घेताच मुख्यमंत्री जॉन यानी स्वत:च विधानसभेत विश्वासाचा ठराव मांडला. तो नापास होऊन त्याचे मंत्रिमंडळ गडगडले. धोका पत्करून एक चांगली प्रथा जॉन यानी त्यावेळी पाडली. तिचेच पुनरुज्जीवन मेनन यानी केले. लोकशाही टिकविण्यासाठी जॉन व मेनन यानी पाडलेल्या अशा निकोप पायंड्यांची आवश्यकता आहे.

## राज्यपालांची जबाबदारी

आपले गडगडणारे सरकार सावरण्यासाठी विधिमंडळाची बैठक बेमुदत तहकूब करण्याचा सल्ला मुख्यमंत्र्यांनी दिला तर तो मानावयाचा नाही अशी प्रथा राज्यपालानी पाडली पाहिजे. राज्यपाल केवळ घटनात्मक प्रमुख आहेत. मुख्यमंत्र्यांचा सल्ला त्यांनी मानलाच पाहिजे असा युक्तिवाद मुख्यमंत्र्याच्या बाजूने नेहमी करण्यात येतो. वर मी म्हटल्याप्रमाणे मुख्यमंत्र्याचा सल्ला राज्यपालांनी सर्वसाधारणपणे मानला पाहिजे हे खरे; पण आता सल्ला देताना मुख्यमंत्री केवळ आपले सरकार वाचविण्याची दृष्टी न ठेवता लोकशाही मूल्याची कदर करतील अशी अपेक्षा आहे. घटनेप्रमाणे कारभार चालतो की नाही हे पाहण्याची जबाबदारी केंद्रपातळीवर ज्याप्रमाणे राष्ट्रपतीवर त्याप्रमाणे राज्यपातळीवर राज्यपालावर आहे. बहुमत गमावलेल्या किंवा गमावण्याच्या मार्गावर असलेल्या मुख्यमंत्र्याने स्वत:चे सरकार सावरण्यासाठी दिलेला सल्ला मानण्याचे बंधन अर्थातच राज्यपालावर नाही. तुमचे बहुमत गमावल्याचा संभव असताना विधिमंडळाची बैठक बेमुदत स्थगित करण्याचा तुमचा सल्ला मानून विधिमंडळाचे तोंड चुकविण्याची व सरकार सावरण्याची संधी मी तुम्हाला देणार नाही. विधिमंडळाला सरळ तोंड द्या व तुमच्यामागे बहुसंख्य सभासदाचा पाठिंबा असल्याचे सिद्ध होऊ द्या, असे राज्यपालाने मुख्यमंत्र्यास सांगितले पाहिजे. योग्य करणासाठी मुख्यमंत्र्यांचा सल्ला डावलण्याचा अधिकार राज्यपालांना आहे की नाही हा प्रश्न एखाद्या वेळी राज्यपालाने धसास लावून लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी जरूर तर राजीनामा देण्याचा बाणेदारपणा दाखवावा. पण त्यासाठी राज्यपाल लोकनियुक्त हवा. सध्याच्या पद्धतीने नेमलेल्या राज्यपालाकडून अशा बाणेदारपणाची अपेक्षा करण्यात फारसा अर्थ नाही.

लोकशाही मूल्याचे रक्षण करण्याच्या बाबतीत राज्यपालाने आपली जबाबदारी पार पाडली नाही तर केंद्र सरकारने त्याला ती पाडण्यास भाग पाडले पाहिजे.

पण आपल्याला अनुकूल राज्यसरकारे टिकवायची व विरोधी सरकारे पाडावयाची, त्यासाठी कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गाचा विधिनिषेध बाळगावयाचा नाही असेच जेथे केंद्र सरकारचे धोरण आहे तेथे केंद्र सरकारकडून लोकशाही मूल्यांची खरोखर कितपत कदर होईल याची शका आहे. काश्मीर व हरियानामधील घटना काही केंद्र सरकारला अधारात ठेवून झालेल्या नाहीत. केंद्राने मनात आणले असते तर विधिमंडळाची बैठक बेमुदत स्थगित करू नका अशा सूचना ते मुख्यमत्र्यांना व राज्यपालांना देऊ शकले असते; पण दोन्ही राज्याचे मुख्यमत्री इंदिरा गटाचे असल्याने त्यांची सरकारे टिकविण्यात केंद्राचे हितसबध गुतलेले होते. मग ही सरकारे ज्यामुळे गडगडण्याचा संभव होता अशा सूचना केंद्र सरकार त्याना कशा देणार? काश्मीर व हरियानात लोकशाहीची पायमल्ली होत असता पक्षीय हिताच्या दृष्टीने इदिरा गांधी सरकारने ती होऊ दिली.

## राष्ट्रपतींकडून अपेक्षा

लोकशाही टिकविण्याच्या बाबतीत यानंतरची जबाबदारी राष्ट्रपतींची. केंद्र सरकारने याबाबतीत आपली जबाबदारी पार पाडली नाही तर त्या सरकारला ती पार पाडण्यास भाग पाडण्याचे कर्तव्य राष्ट्रपतीचे आहे. राष्ट्रपती केवळ घटनात्मक प्रमुख असले तरी घटनेने घटनापालनाची जबाबदारी राष्ट्रपतीवर टाकली आहे. त्यांनी घटनाभग केल्यास त्याची चौकशी करून त्यांना अधिकार-पदारून दूर करण्याची तरतूद घटनेत आहे. लोकशाही हा आपल्या प्रजासत्ताकाच्या घटनेचा प्राण आहे. तेव्हा लोकशाहीची पायमल्ली होत असता ती थाबविण्यासाठी राष्ट्रपतीनी काही उपाय योजले तर घटनेशी ते सुसगतच होईल; पण मग राष्ट्र-पतिपद ही केवळ मानाची जागा. प्रत्यक्षात राष्ट्रपतीना कोणतेही अधिकार नाहीत. पंतप्रधानांच्या सल्ल्यानेच त्यानी नेहमी वागले पाहिजे हे आतापर्यंत रूढ करण्यात आलेल्या या पदाबद्दलच्या भूमिकेचे काय? या भूमिकेची आणि घटनापालनाच्या जबाबदारीची सांगड कशी घालावयाची? घटनापालनाची जबाबदारी ही मुख्य. तिच्याशी विसंगत असा पंतप्रधानाचा किंवा केंद्र सरकारचा सल्ला राष्ट्रपतीनी मानावयाचा नाही. काश्मीर व हरियानाच्या बाबतीत सुद्धा राष्ट्रपतीनी मनात आणले असते तर केंद्र सरकारमार्फत योग्य ते आदेश ते देऊ शकले असते. पण राष्ट्रपतिपद केवळ नामधारी आहे ही स्वातत्र्याच्या २२ वर्षांत रूढ झालेली कल्पना सोडावयास आमचे राष्ट्रपती व राजकीय नेते अजूनही तयार नाहीत.

लोकशाही मूल्ये टिकविण्याचे बाबतीत ससद काही करू शकेल असे वाटत नाही. संसद म्हणजे नुसते चर्चापीठ बनलेले आहे. अधिकारारूढ पक्षाच्या नेत्यांनी आधीच घेतलेले निर्णय तेथे बहुमताच्या जोरावर मजूर केले जातात.

मुख्यमंत्र्यांपासून राष्ट्रपतीपर्यंत कोणत्याच पातळीवर लोकशाहीची पायमल्ली थोबविण्यासाठी योग्य उपाय योजले गेले नाहीत तर लोकशाही टिकविण्याची

अखेरची जबाबदारी लोकांवरच येऊन पडते. लोकप्रतिनिधींना निवडून दिल्यानंतर लोक गाफील राहतात त्याचा फायदा घेऊनच लोकशाहीविरोधी कारवाया केल्या जातात. लोकशाहीची पायमल्ली करणाऱ्या मुख्यमंत्र्यांना पक्षांतर करणाऱ्या संधि-साधू आयाराम-गयारामांना पुढच्या निवडणुकीत निवडून द्यावयाचे नाही असा निर्धार लोकांनी केला पाहिजे. मुदतपूर्व निवडणुकीत अनेक आयाराम-गयारामांना मतदारांनी पुन. निवडून दिले नाही, पण निवडलेल्या प्रतिनिधींतूनच नवे आयाराम-गयाराम निर्माण झाले. पुढच्या निवडणुकीत त्यांना पाडून जनतेने धडा शिकविला पाहिजे. संधि-साधूंचे हे पीक थांबविण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे जनतेने कोणत्यातरी एका पक्षास मोठ्या बहुमताने निवडून देणे. तसे झाल्यास काही थोडे सभासद फुटले तरी बहुमत धोक्यात न येता सरकार स्थिर राहील.

रायकीय नेते व लोकप्रतिनिधी लोकशाहीबद्दलची आपली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडीत नाहीत, तेव्हा आता जनतेनेच अधिक जागरूक होऊन ही जबाबदारी पार पाडली पाहिजे. सत्तेच्या राजकारणात न गुरफटलेल्या खऱ्या लोक-नेत्यांनी व विचारवंतांनी निर्भयपणे जनतेस या बाबतीत मार्गदर्शन केले तर आपल्या राजकारणाला अजूनहि चांगले वळण लावता येईल.

□ □ □


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

# विचार धारे

समीर

## ◻ पार्किन्सनचे ' समिती-शास्त्र '

अत्यंत विनोदी बुद्धीबद्दल जगभर प्रसिद्ध असलेले ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ प्रा. नॉर्थकोट पार्किन्सन नुकतेच भारतात येऊन गेले. त्यानी दिल्लीच्या मुक्कामात केलेल्या भाषणात व पत्रकाराशी झालेल्या प्रश्नोत्तरीत 'जाहिरातबाजीच्या सदुपयोगा 'पासून ' समिती-शास्त्रा 'पर्यंत निरनिराळ्या प्रश्नावर कमालीची मार्मिक पण तेवढीच विनोदी मते प्रकट केली. त्यातले काही मासलेवाईक नमुने :

जाहिरातबाजी . आजचे युग जाहिरातबाजीचे आहे, कारण आजचा माणूस आपल्या पूर्वजापेक्षा अधिक भोळसट आहे. औद्योगिक समाजाचे जीवन जाहिरातबाजीशिवाय अशक्य आहे. मागणीप्रमाणे पुरवठा होतो हा आजचा सर्वमान्य सिद्धात भोंगळ आहे उदाहरणार्थ, प्राथमिक पुस्तकातही असे शिकविले जाते की, प्राचीन काळी एखाद्या रानटी माणसाच्या समोर एखादा अजस्र हिंस्र पशु उभा राहिला असेल तेव्हा त्याला दुरूनच मारता येण्यासारखे एखादे हत्यार असते तर बरे झाले असते, असे त्या माणसाला वाटले असेल. पुढे त्या माणसाच्या विधवेलाही तसे वाटले असेल, व आपल्या पुढच्या नवऱ्याजवळ तरी असे हत्यार असावे असे वाटले असेल. या परिस्थितीत मागणी होती, पण पुरवठा लगेच झाला नाही. पण या निव्वळ थापा आहेत असे एखादे हत्यार अस्तित्वात असल्याचे त्या माणसाला माहीत असल्याशिवाय ते जवळ बाळगण्याची कल्पना त्याच्या मनात येणारच नाही. इतिहासाची साक्ष सध्याच्या लोकप्रिय आर्थिक सिद्धांताच्या अगदी उलट आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, पुरवठा करणाराच नेहमी मागणी निर्माण करतो. कारण पुढे आपल्याला कोठल्या गोष्टीची गरज भासणार आहे हे बहुतेक कोणालाच आधी सागता येत नाही. गरजवताने मुळात अस्तित्वात नसलेल्या वस्तूची मागणी करण्यापेक्षा निर्मात्याने आपल्या फालतू उत्पादनाची सोय लावणे अधिक सोपे असते.

कुठलाही व्यवसाय जाहिरातबाजीवरच वाढतो. पण जाहिरातदाराना आपला खरा प्रतिस्पर्धी कोण आहे हे कळत नाही. उदाहरणार्थ, बियर तयार करणाऱ्या माणसाचा खरा शत्रू बियर तयार करणारा दुसरा माणूस नव्हे, तर आइस्क्रीम तयार करणारा माणूस होय. त्याचप्रमाणे पुस्तक-प्रकाशकाचे खरे प्रतिस्पर्धी दुसरे

पुस्तक-प्रकाशक नसून टेनिसची रॅकेट किंवा अशीच इतर मनोरंजनाची साधने तयार करणारे इसम होत. पुस्तक-प्रकाशकानी निरनिराळ्या पुस्तकांची जाहिरात करण्यापेक्षा एकत्र येऊन 'पुस्तक' या चीजेची जाहिरात करावी. पुस्तकाचा खप वाढविण्यासाठी आणखी एक गोष्ट करणे शक्य आहे, व ती म्हणजे पुस्तके ठेवायची शेल्फ सवलतीच्या दरात देणे. एकदा शेल्फ घेतली की तिच्यासाठी पुस्तके घ्यावीच लागतील, नाही का?

साम्यवादी देशात जाहिरात-पत्रकाची जागा सरकारी पत्रकाने घेतली आहे. एखादी वस्तू बऱ्याच वर्षांच्या टचाईनंतर मिळू लागली की पत्रकात म्हटले जाते: 'ही वस्तू सरकारी मेहरबानीने जनतेला देण्यात येत आहे.'

समिती-शास्त्र: कुठलीही नोकरशाही समितीशास्त्राच्या सिद्धान्तानुसार वागत असते. म्हणजे प्रथम निर्णय घ्यायला असमर्थ अशा पाच मडळीची एक समिती निर्णय घेण्यासाठी नेमण्यात येते. अर्थात निर्णय घेतला जात नाही व समितीवर टीका होते. मग टीकाकाराची तोंडे बद करण्यासाठी त्यांनाही समितीत घेतले जाते. (साम्यवादी देशात जरा निराळे तंत्र वापरतात – तेथे टीकाकाराचा निकाल लावण्यात येतो.) अशा रीतीने सभासदाची सख्या वाढत वाढत १९ ते २३ झाली की, अकार्यक्षमतेचा उच्चाक गाठला जातो. सभासदाची सख्या एवढी वाढल्याने समितीच्या बैठकीचे टेबल इतके मोठे होते की, एका सभासदाचे बोलणे दुसऱ्या टोकाला ऐकू जात नाही. मग जवळ जवळ बसलेली मडळी आपसात बोलू लागतात व एकाच वेळी अनेक विषयावर गप्पा सुरू होतात. असे झाले की समिती-शास्त्राची परमावधी झाली असे समजावे.

विलबाचा सिद्धांत: नोकरशाही कुठल्याही गोष्टीला नकार देते ती विरोधाने नव्हे तर विलबाने. एखादी कल्पना पुढे आली की ही मडळी प्रथम 'उत्तम' असे म्हणून माना डोलावतात, मग ती कल्पना ज्याने काढली त्याला रिटायर व्हायला आठ वर्षे बाकी असतील तर पुढे म्हणतात – 'पण ती फलद्रूप व्हायला किमान दहा वर्षे लागतील.' याच्या पुढची पायरी म्हणजे एक समिती नेमली जाते. ही समिती एक पोट-समिती नेमते. या पोट-समितीचा अहवाल मत्र्याला पेश केला जातो. मग मंत्री त्या कल्पनेला अनुकूल अशी वेळ आली आहे की नाही याचा विचार करतो. अर्थात तो मागची निवडणूक केव्हा झाली अन् पुढच्या निवडणुकीला किती दिवस उरले आहेत याचाही विचार करतो. असा हा अनिर्णयाचा विलंबित राग.

□ □ □

# स्वप्न नगरी

प्रभाकर पेंढारकर

सनईचे मद सूर.

लोकाची हलकेच चाललेली कुजबूज !

छतात लपलेल्या दिव्यांचा मद प्रकाश.

विस्तीर्ण सभागार...आरामशीर प्रशस्त खुर्च्या !

त्यावर आपल स्वत.चं नाव, लिहिलेल आहे. त्यामुळे ह्या खुर्चीवर बसताना आज आपण कुणी विशेष आहोत, अस उगीचच वाटू लागतं. आजवर जे खडतर कष्ट उपसले ते विसरायला होतात. सारंच कसं जादूनगरीतल्यासारखं वाटतं. मोहक, सुखद, काहीसं अद्‌भूत !

असच जग पडद्यावर दिसावं म्हणून पडद्यामागचं खडतर जिणं !

आणलेल्या पैशाचं जबरदस्त वाढत असलेल व्याज,

लहरी कलावताची मर्जी राखण्यासाठी पत्करलेली लाचारी,

स्टुडिओच्या तारखा जुळवून घेताना पडलेले कष्ट,

पैसे कमी पडल्याने अनेक बाबतीत पत्करलेली तडजोड,

आणि ह्या सर्व परिणामातून चित्र चालेल वा नाही ही सतत डोक्यार टागती तलवार असल्याने आलेली अगतिकता...

असहायता, स्वत.चीच चीड, दुबळा सताप...

आणि तसच बरंचस काही—!

ह्या साऱ्याची 'जाणीव' ह्या सुखद वातावरणानं बोथट करून टाकलीय्. माफक प्रमाणात धुंदी चढलीय्, स्वतःच्याच यशाची !

नाहीतरी फिल्म बनवण ही गोष्ट फार खडतर आहे.

कष्टाची आहे. मोठ्या जिकीरीची आहे. विशेषत: प्रादेशिक भाषेत !

फेब्रुवारीची तेरा तारीख !

संध्याकाळची वेळ !

दिल्लीची थंडी अद्याप हवेत रेंगाळते आहे.

तेरा फेब्रुवारी...

संध्याकाळ...

दिल्लीतली थंडी...

बहुतेकांच्या अंगावर गरम सूट...

कोटावर निळे-गुलाबी रेशमी फूल

हा आहे एक सन्मान...

बहुतेकांच्या अंगावर (बंगाली चित्रव्यावसायिक सोडले तर) गरम सूट आहेत. त्यावर फुललेले निळे-गुलाबी रेशमी फूल ह्या कलावंताच्या सन्मानाची खूण आहे.

फोटोग्राफर नाव विचारताहेत. स्वतःचं कार्ड बळेबळे तुमच्या हातात देत आहेत.

मधूनच सनगनचा प्रकाश तुमचा चेहरा उजळून टाकतो. त्या प्रकाशामागून एक बारीक सुरेल किरकिर ऐकू येतेय्. ही कॅमेऱ्याची—फिल्म्स डिव्हिजनच्या अथवा दिल्ली टेलिव्हिजनच्या !

कोणी मायक्रोफोन पुढे करून विचारते आहे,

"तुम्हाला खात्री होती की आपल्याला पारितोषिक मिळेल ?"

विचार करून उत्तर दिलं पाहिजे. उद्या हे उत्तर हजारो कानावर जाणार आहे—रेडिओवरून ?

मध्येच कुणीतरी म्हणतं...

"ही खुर्च्या, टेबलं पुसलेली नाहीत. धुळ लागतेय् हाताला !"

वास्तविक अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करायच असतं. दिसल्या तरी बोलायचं नसतं. पण कुणीतरी बोलतंच आणि मग उगीचच आजची सकाळ आठवते.

सकाळी रंगीत तालमीसाठी विजेत्याना इथ बोलावलं होतं. ह्यावर्षी ह्या विजेत्याना फक्त एकेकच 'सीट' मिळालेली होती. फार दुरून माणसं आलेली ! कुणाबरोबर पत्नी, कुणाची मुलगी, कुणाची बहिण, पति, आई...हा सोहळा पाहण्यासाठी आलेली. ह्यापैकी कुणालाही 'सीट' नाही. पारितोषिकं काही इतकी वजनाची नाहीत की ती उचलण्यासाठी दोन माणसाची गरज पडावी.

"विज्ञान भवनात फक्त अकराशेच माणसं बसू शकतात. तेव्हा ह्या ३०–४० विजेत्याना प्रत्येक एक सीट जादा कशी देता येईल ?"—

"काय करणार, अगोदरच सीटस् गेल्यात !"...

"दिल्ली आहे ही ! मंत्री, सेक्रेटरी, मान्यवर पार्लमेंट सदस्य, व्ही. आय्. पीज्ना बोलावले पाहिजेच. ते आल्यानं तुमचा सन्मान नाही का वाढणार ?—मग

सीट कसली मागता?..."

केरळचा कुणी गृहस्थ आमंत्रणपत्रिका तालिम संपताच टेबलवर फेकून देतो. गरम डोक्याचा कोणी मराठी माणूस समारंभाला न येता, सरळ मुंबईला अथवा पुण्यास परतण्याची धमकी देतो. कोणीतरी सरळ सेक्रेटरीसमोरच धरणं धरतो. एकही सीट मघाशी शिल्लक नसता ह्या मंडळींची गरज कशीबशी भागवली जाते.

पण आता त्याचं काय? शेवटी सर्व ठीक झालं ना; मग ह्या कटू आठवणी कशाला? राष्ट्रपती येत आहेत, तिकडे पहा! ते पहा—आलेच!

राष्ट्रगीत!

कार्यक्रमाची सुरुवात!

डेव्हिड मायक्रोफोनवर आहेत. त्यांचा आवाज खूप ओळखीचा वाटतो आहे.

सारं काही ठीक चाललं आहे.

राज्यमंत्री गुजराळ सर्वांचं स्वागत करतात.

त्यानंतर परीक्षक मंडळातर्फे इजरा मीर बोलायला उठतात.

...मंडळानं एकूण किती फिल्म्स पाहिल्या वगैरे आकडेवारी ते सांगतात. छायाचित्रण, ध्वनिलेखन, रंगभूषा आदि तांत्रिक अंगे सुधारली...पण Thematic content च्या दृष्टीने अद्याप खूपच प्रगती व्हायला हवी...हे Thematic-content काय प्रकरण आहे?

परीक्षक मंडळापैकी कुणाला तरी विचारलं पाहिजे.

देशात सत्तर टक्के जनता निरक्षर आहे.

ऐंशी टक्के लोक अशा खेड्यात राहतात की जेथे सिनेमा थिएटर्स नाहीत.

इथं 'सुजाता'च्या शेजारी 'जंगली' उभा असतो आणि 'अनुपमा'च्या समोर 'जानवर' ठाकलेला असतो.

भांडवलदार चित्रपटाकडे धंदा म्हणून पहातो.—प्रेक्षक डोळ्याला त्रास न होणारी सस्ती करमणूक म्हणून!

कला...कला म्हणत चित्रपटासाठी जिवाचे रान करणारे चित्रकार ह्या दोहोंच्या-बरोबर फरफटत ओढले जात असतात.

पण त्याची काळजी करायचं कारण नाही.

मान्यवर मंत्री दिलासा देतात, 'आता फिल्म फायनान्स कॉर्पोरेशन तुमच्या पाठीशी आहे.'

प्रेक्षकांची कशाला काळजी करता! 'सरकार पैसे देईल. तुम्ही चित्रे काढा!'

प्रश्न एवढाच आहे की चित्रांना प्रेक्षक कोण पुरवेल?...सुजाण, सुशिक्षित, रसिक प्रेक्षक.

तो आला नाही तरी चालेल!

चित्रपटाला अलीकडे पारितोषिके ठेवलेली आहेत. प्रत्येक भाषेतील उत्कृष्ट

चित्रासाठी बक्षिस रुपये पाच हजार !

शिवाय दिग्दर्शकासाठी रक्कम रुपये दोन हजार !

अधिक दिल्ली येण्याजाण्याचे पहिल्या वर्गाचे भाडे !

डेव्हिड मायक्रोफोनवर सांगत आहेत,

" ह्या वर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपट."

" गोपी बायेन, बाघा बायेन "

" सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक—सत्यजित रे."

ह्या गृहस्थांची उंचीच सहा फूट आणि काही इंचं !

कोणी म्हटलं आहे, ह्यांची उंची (शारीरिक) कमी असती तर कदाचित डॉ. बिधानचंद्र रॉयनी त्यांच्या ' पथेर पांचाली 'ला भांडवल पुरवले नसते. (त्यांचीही उंची सहा फुटापेक्षा अधिक होती.)

ह्यांना मघाशी हैद्राबाद हाऊसमध्ये चहा घेताना पाहिलं होतं. त्यावेळी तर हे सुटात होते. एवढ्यात कधी कपडे बदलून, धोतर कुडता आणि शाल ह्या अस्सल बंगाली वेषात आले ? चेहऱ्यावर आत्मविश्वास इतका की ते पारितोषिक ह्यांचंच?

राष्ट्रपतीच्याकडं ठेवायला दिलं, आज परत आणायला निघालेत. दुसऱ्या क्रमाकांचे चित्र—तुलाथरम् '

ही केरळीय मंडळी चित्रपट व्यवसायात झपाट्यानं पुढं येत आहेत. दोन वर्षांपूर्वी ' चेम्मीन 'ला भारतातील सर्वोत्कृष्ट चित्राचे पारितोषिक मिळाले होते. आणखीन काही वर्षांत बंगाली लोकांच्या खांद्याला खांदा लावून ही मंडळी उभी राहणार ! पण त्याबद्दल काळजी करायचे कारण नाही. पहिला सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठीच ठरला होता ना ! मराठी चित्रपटांच्या परंपरा उज्ज्वल आहेत. भूतकाळ गौरवशाली आहे. वर्तमानाची काळजी कशाला ?

' चेम्मीन ' वरून आठवले, ' प्रादेशिक भाषेतील चित्रपटाच्या समस्या ' ह्या परिसंवादात दुसऱ्या दिवशी बोलताना ' चेम्मीन 'चा नायक मधू फार सार्थ अशी काही वाक्ये बोलून गेला.

' हिंदी चित्रव्यवसायातील समृद्धता आमच्याकडे नाही ही चांगली गोष्ट आहे. ...आम्ही नुसतेच नट आहोत. ' स्टार्स ' नाही. आमचा प्रेक्षक चोखंदळ आहे. काही चांगले दाखवले की तो आम्हाला दाद देतो...मनमुराद कौतुक करतो... चांगलं काही करूं शकलो नाही तर व्यक्तिपूजेचे देव्हारे माजवत तो आमच्या मागं धावणार नाही ह्याची आम्हाला जाणीव आहे. भले आम्हाला हजारो रुपये मिळत नसतील...आम्ही आमच्या मीठभाकरीवर खूश आहोत !"

उत्कृष्ट अभिनेता म्हणून अशोककुमारांचं नाव डेव्हिड घेत आहेत.

प्रेक्षकांच्या नजरा ह्या साठीच्या तरुणाला शोधत आहेत.

हसरे, रुबाबदार आकर्षक व्यक्तिमत्त्व !

गेली तीस वर्षे प्रेक्षकांना मोहवत असलेले !

पण अशोककुमार कुठं आहेत ?

ते आलेले नाहीत. त्यांचं पारितोषिक हृषीकेश मुकर्जींनी स्वीकारलं.

सर्वोत्कृष्ट अभिनेत्री–शारदा !

उर्वशी पारितोषिकाची विजेती !

ही गुणी नटी मूळची आंध्राची ! पारितोषिक मिळालं मल्याळी फिल्मकरिता ! पण त्या चित्रपटातले संवाद ती बोललेली नाही. तिच्या अभिनयाला साजेशा भावपूर्ण भाषेत बोलणाऱ्या ओमनाबाई तेथे होत्या काय ?

– माहीत नाही !

असत्या तर सिरॅनोप्रमाणे त्यांच्याही तोंडून कदाचित

' My wards...her lips '

असे काही उद्गार आले असते.

ही छोटीशी, गुलाबी फ्रॉकातली नाजूक कळी–बेबी राणी !

' नन्हा फरिस्ता 'मधील तिच्या कामाचं बक्षिस स्वीकारण्यासाठी ती स्टेजवर आली तसा टाळ्यांचा कडकडाट थांबेचना !

' एकटी 'मधील गरीब, एकाकी, मुलाकरिता कष्ट उपसणारी, प्रेमळ पण तितकीच मानी मधूची आई इथं उंची सफेद भरजरी साडी नेसून आली होती. वेष बदलला पण चेहऱ्यावर तोच भाव होता–

सोज्वळ, सात्विक आणि प्रसन्न !

डॉ. काशीनाथ घाणेकर दिल्लीच्या थंडीतही मराठी बाण्यानं नेहरू सदरा व विजार ह्या वेषात रुबाबात आले होते.


लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे ॲण्ड कं. प्रा. लि. मुम्बई-१.

दिग्दर्शक राजाभाऊ ठाकूरांची ही तिसरी वेळ !

'मी तुळस तुझ्या अंगणी,' 'रंगल्या रात्री अशा' आणि आता 'एकटी !'

तरीही राजाभाऊ विनम्र होते. गप्प गप्प होते.

नंतरच्या परिसंवादातही तसेच राहिले !

त्यांचं नाव बोलण्यासाठी पुकारलं गेलं, तेव्हा ते उठले नाहीत.

'बोलायचं काय ?'

मराठी चित्रपटसृष्टी ही भारतीय चित्रांची आद्यजननी म्हणून पूर्वपुण्याईचा गौरव तरी उगाळायचा किंवा आताच्या सर्वच दृष्टीनी आलेल्या दारिद्र्याच्या रडकथा तरी सांगायच्या. दोन्हीही गोष्टी, इथं, अप्रस्तुतच,

कोणी म्हणाल तेच शेवटी खरं –

'सरकार अनुदाने देईल. कर माफ करेल, भांडवल पुरवेल. पण चांगली चित्रे आणि सुजाण प्रेक्षक ह्याखेरीज चित्रपटाचा दर्जा सुधारायचा नाही.'

पण त्याबद्दल नंतर बोलता येईल. आता कार्यक्रमाकडे लक्ष देऊ. पारितोषिक वितरणानंतर राष्ट्रपतींनी विजेत्याचं कौतुक केलं, आणि चित्रपटसृष्टीकडून राष्ट्राच्या काय अपेक्षा आहेत हे सांगितलं.

रागिणी पद्मिनीची नृत्ये...मन्ना डे आणि महेंद्र कपूर ह्यांची गाणी झाली... मध्यंतर झाला.

त्यानंतर सर्वोत्कृष्ट माहितीपटाचे पदक मिळालेली 'एव्हरेस्ट' ही डॉक्यूमेंटरी सुरू झाली.

चित्र रंगीत होतं. संगीत शंकर जयकिसन ह्यांच होतं.

ह्यापूर्वी हा सन्मान तीन वेळा मिळवणाऱ्या कल्पक दिग्दर्शक थापानी हे चित्र दिग्दर्शित केलं होतं. एव्हरेस्ट विजयाची ही रोमहर्षक गाथा अनेक परिश्रमानी इथं पडद्यावर साकार केलेली होती.

पण सभागारातील बहुतेक खुर्च्या रिकाम्या होत्या.

संवेदनाक्षम, सुशिक्षित, सुविद्य, सन्माननीय आमंत्रितांपैकी बहुतेकजण आपापल्या घरी परतले होते.

मी मात्र थांबलो.

त्या अंधारात श्री. इजरा मीर अथवा परीक्षक मंडळाचे कोणी सदस्य दिसतात का हे मी शोधत होतो. मघा सांगितलेल्या त्या Thematic Content बद्दल मला त्यांना विचारायचे होते.



एक-दोन-तीन-चार-पाच...मीना घड्याळाचे ठोके मोजत होती. ठोके थांबल्यावर ती मनाशीच म्हणाली, अरे बापरे म्हणजे पहाटेचे पाच वाजले. रात्रभर आपल्या डोळ्याला डोळा लागला नाही. हे असेच किती चालायचे ? ह्याचा काहीतरी सोक्षमोक्ष लावायलाच हवा. आधीच नाजुक आपण. नाजुक म्हणताना ती मनाशीच हसली. दिवसभर एवढे काम उपसत असताना नाजुक कसे ? हा आपल्या आईचा खास शब्द आहे. तिला विचारीला काय कल्पना आपल्या माघारी लेकीवर अशी परिस्थिती येईल.

जीवंतपणी नेहमी म्हणायची. "मीना, तुझ्या सौंदर्यात मुक्त हस्ताने देवाने

# नयन तुझे जादुगार

**सौ. शान्ता वडाळकर**

नाजुकपणा ओतलाय. माझ्या ह्या नाजुक कळीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपणारा मिळावयास पाहिजे."

त्यावेळी मी वाईट तोंड करून, "मी काही तळहाताच्या फोडासारखी नाजुक आहे का ?" म्हणून उलट प्रश्न करायची.

आई म्हणायची, "तू फुलासारखी नाजुक आहेस ग, पण तुझी जपवणूक तळहाताच्या फोडाप्रमाणे नाजुकपणे व्हावयास पाहिजे."

आज एकेक आईचे नुसते शब्दच आठवतात. आता केवळ त्या शब्दांचाच दिलासा.

'आई, तुझ्या मनाप्रमाणे जपवणूक करणारा मला मिळेल का ?'

शिंकेचा आवाज. मामाची स्वारी उठलेली दिसतेय. उठल्याबरोबर पंधरा-वीस शिंकाची सलामी देऊनच मामाच्या दिनक्रमाला सुरुवात होते. मामा हल्ली लवकरच बाहेर जातात. ते एकदा गेले की मामीचा तोफखाना सुरू. तेव्हा आपल्याला लवकरच झोप न लागणाऱ्या कारणावर उपाययोजना करावयास पाहिजे. आपले मनोगत लिहून कळवावे काय ? पण कोणाला ? पानावर पाने फाडली जाऊ लागली. केवळ नजरानजरीच्या भाषेवर आपण काय समजणार ? आणि काय लिहिणार ? आपले डोळे खरच फसवणार तर नाहीत ना ? छे, त्याना सुद्धा आईचा आशीर्वाद आहे. आई म्हणायची, "मीना तुझे डोळे इतके सुदर आहेत इतके सुदर आहेत; इतके बोलके आहेत की तुझ्या दृष्टीत कुणाची दृष्टी मिळाली की ती तुझ्याच स्वाधीन झाली. तुझे वडील एवढे रागीट होते. पण तू डोळयांनी त्याचा राग शमवायचीस आणि आपल्याला हवे तसे करून घ्यायचीस. पुढे पुढे ते सुद्धा तुझ्या डोळ्यात तासन् तास पाहून म्हणायचे, "मीनाचे निष्पाप डोळे सत्याचाच ठाव घेतील." आणखी कितीतरी आई माझ्या डोळ्यावर बोलत बसावयाची शेवटी मरतानासुद्धा म्हणाली. "मीना, तुझ्या डोळ्याशी प्रामाणिक रहा." आई, मी डोळ्याशी प्रामाणिक राहिले ग. पण भविष्याच्या उदरातले मला काही आकलन होत नाही. तिथे माझी दृष्टी थिटी पडते कां ? आई मी फसले नाही ना ? माझ्या डोळ्यात पाणी पाहिले की तू कशी कासावीस व्हायचीस ? ...आता

मीनाच्या नावाने तारस्वरात ओरडतच मामी मीना बसली होती तेथे आल्या. "काय ग आठ वाजले तरी अजून तू इथेच. इतक्या वेळ हाक मारतीय. कान फुटले की काय तुझे ऐकू न यायला? आणि हे काय धंदे चालले होते. कोणाला ग चिठ्ठी लिहित होतीस? आज काल नाही तरी तुझे लक्षण मला ठीक दिसतच नाही. ऑफिसच्या नावावर तुझे दुसरेच धदे तर चालू नाहीत? तरी मी ह्याना म्हणत होते की कार्टी काही सुध्या लक्षणाची नाही, आपल्या घरी ठेऊ नका. पण माझे ऐकतेय कोण? मी म्हणजे फुकटची मोलकरीण, राब राब राबावं तरी कोणाला त्याची पर्वा नाही. आणि हे काय, डोळयात पाणी? भरल्या घरांत रडत जाऊ नकोस म्हणून कितीदा तुला सागू? आईबापाला खाल्लस तसं मलाही खा. म्हणजे सुटशील, कँदाशीण मेली. जा. काळ कर तोंड माझ्या समोरून." मीनाला रोजचीच अशा बोलण्याची सवय झाली होती. तरी आज तिला हे सहन करवेना. काहीतरी झटकन् मामीना सुनवून द्यावे असे तिला फार वाटले.

पण ती निमूटपणे स्वंयपाकघरात निघून गेली. कामाचा परगणा आ वासून तिचीच वाट पहात होता. पदर खोचून ती कामाला लागली.

मामीचे सगीत मामाचे आगमन होईपर्यंत चालू होतेच. मामा घरात आल्यावर मात्र ते एकदम बद पडले. मामांचा घरात तसा वचकच होता. मामानी मीनाला 'संध्याकाळी पाच वाजता मडळी येणार आहेत तर तयार रहा' म्हणून सागितले. मीना जास्तच बावरून जाऊन काम करू लागली. दुसरे काय करणार?

सगळे काम आटोपता आटोपता मीनाला न जेवताच ऑफिसची वाट धरावी लागली. मनात सध्याकाळच्या कार्यक्रमाची भीती होतीच, म्हणूनच तिची पावले जड झाली. रस्त्याने जाताना रोज अगदी सहज होणारी गोष्ट मीना टाळणार होती. खरच सहज का मीनाच्या मनात शंका डोकावली! इष्ट स्थळी ती येऊन पोहोचली. नकळत निश्चय ढासळला. नजर वर गेली. डोळयाची भाषा सुरू झाली. आपल्याला असे काय होते आहे? ह्याचे तिला कोडेच पडले. कोण कुठला मनुष्य! त्याचे नाव गाव काही माहीत नाही. एकदा ऑफिसला जाताना नजर सहज वर गेली आणि...खरच का आपण प्रेमात पडलो आहोत? मीना स्वत:लाच रोज प्रश्न करी.

आज आपण ठरवूनही वर पाहिल्याशिवाय जाऊ शकलो नाही ह्याचे तिला आश्चर्य वाटले. परिस्थितीची जाणीव होताच तिचा चेहरा पडला त्या व्यक्तीकडे एक रागाचा सूक्ष्म कटाक्ष टाकून ती पुढे निघाली. ती व्यक्ती आपल्याला वर का बोलवीत नाही? नुसत्या ह्या डोळयाच्या भाषेने पुढील प्रश्न सुटणार आहेत का? का आयुष्यभर आपण असेच झुलवले जाणार? एक ना दोन हजारो प्रश्नाची मालिका तिच्या मनात गतली गेली.

ऑफिसमध्ये कामातही तिचे लक्ष लागेना. लवकरच ती तेथून निघाली. काही एक निश्चय मनाशी ठरवून ती झपाझप जात होती. नेहमीच्या दृष्टि-मीलनाच्या

जागेवर ती थबकली. घरावर 'विजय प्रसाद' असे नाव कोरले होते. जिन्यावरून ती वर गेली व बरोबर अनुमानाने एका दरवाजाजवळ थांबली. दरवाजा नुसता लोटलेलाच होता. पुढील हॉल भव्य असून त्यात प्रेक्षणीय अशी चित्रे टांगलेली होती. त्यावर ' कलामहल 'ची पाटी मोठ्या दिमाखाने लटकत होती. आपण एखाद्या अद्‌भुत महालात तर उभे नाही ना ? अशी शंका तिच्या मनात चमकून गेली. तिची चाहूल अजून कोणालाच लागलेली दिसत नव्हती. तिने थोड्या फाजील धिटाईनेच आतल्या खोलीत डोकावून बघितले. तिच्याकडे पाठमोरी असलेली एक व्यक्ती चित्र चितारण्यात अत्यंत तन्मय झालेली तिला दिसली. ती तन्मयता पाहून सकाळपासूनचा सारा ताप ती विसरून गेली. आपोआप तिची पावले पुढे पडली. एक सुंदर कलाकृती रूप घेत होती. अहाहा ! काय भावपूर्ण डोळे ! मीनाच्या अनवधानाने शब्द तोंडावाटे निसटून गेले. आणि त्या व्यक्तीचे तोंड मीनाकडे वळले. कोणाचे डोळे ? सहज प्रश्न ओघळला. मीना तर आश्चर्याने भांबावूनच गेली. तुम्ही कोण ? कुठले ? वगैरे प्रश्न केव्हाच विरघळले. अल्पकाळात मीनाची धीट नजर लाजरी बनली. ती धरणीमातेचा आश्रय घेऊ लागली, पण मधेच ती प्रियकराचे चरणकमल धुंडू लागली आणि......धाडकन् मीना जमिनीवर आदळली. सगळंच अनपेक्षित घडत होते. त्या व्यक्तीलाही क्षणभर काय करावे हे सुचेना. चाकाची खुर्ची पुढे करून मीनाला आधार देण्याचा त्याने प्रयत्न केला. पण आपल्या पांगळेपणामुळे आपण तिला पुरेसा आधार देऊ शकणार नाही ह्याची जाणीव झाली. आज प्रथमच त्याला आपल्या पंगुत्वाचा तिटकारा आला.

पण आपले पंगुत्व सुद्धा मानाचे आहे. देशाच्या अब्रूसाठी आपला पाय खर्ची पडला तर त्याची हळहळ कशाला ? त्यामुळे फार तर मला आवडती स्त्री मिळणार नाही. नाहीतरी आपण तशी अपेक्षा धरणेच योग्य नाही. आजपर्यंत जशी चित्र-कलेने साथ दिली तशी पुढील आयुष्यात पण देवो म्हणजे झाले. पण तिनेच तर ह्या सखीला जवळ आणले आणि म्हणूनच आशा निर्माण झाली. पण मीना हळूहळू शुद्धीवर येत होती. थोड्या वेळातच ती नीट उठून बसली. त्या व्यक्तीची तिने क्षमा मागितली. शुद्धप्रेमापोटीचा सेवाधर्मही तिच्या ठिकाणी वास करीत होता. त्या व्यक्तीच्या जीवनाबद्दल जास्तच आस्था तिला वाटू लागली. तिने त्याचा जीवनवृत्तांत समजून घेण्याची तत्परता दर्शविली.

रमेशचा जीवन वृत्तान्त म्हणजे एक विलक्षण साहस होते. स्वकर्तृत्वावर सैन्या-तील वरची जागा तो भूषवीत होता. गुप्त हेराच्या जाळयात सापडलेल्या एका उच्च अधिकाऱ्याचे प्राण वाचवताना शत्रुहेराच्या गोळीने त्याचा एक पाय निकामी केला. त्या वेळच्या त्याच्या विलक्षण साहसाबद्दल त्या अधिकाऱ्याची सर्व धनदौलत रमेशच्या पायी अर्पण करण्यात आली. तो अगणित पैसा, शारीरिक पंगुत्व व देशसेवेला पाठ फिरवावी लागते ह्याचे दु:ख रमेशला काही सुचू देईना. विनयने—

रमेशच्या एका जीवलग मित्राने त्याला खऱ्या अर्थाने जगात आणले. रमेश चित्र कलेत प्रवीण आहे हे तो जाणून होता. त्याने आपला प्रासाद त्याच्या ताब्यात दिला तो कला–महल करण्यासाठीच. चित्रकलेत रमेशचे खरे कौशल्य डोळे रंग विण्यात होते आणि त्यामुळेच अशाच डोळ्याच्या शोधात तो होता. रस्त्यावरील हजारो व्यक्तीतून त्याला हवे असलेले सर्वस्व मीनाच्या डोळयात प्रतीत झाले होते, आणि त्यामुळेच त्याला तिची रात्रदिन ओढ लागत असे; परंतु आपले पंगुत्व तो जाणून होता म्हणूनच पुढची पायरी तो घेत नव्हता.

मीना मंत्रमुग्ध होऊन त्याची जीवनगाथा श्रवण करीत होती. आपला जन्म ह्याच व्यक्तीसाठी आहे ह्याचा साक्षात्कार तिला होत होता. ज्या व्यक्तीला आपली गरज आहे त्यासाठीच आपले आयुष्य का वेचू नये ? ती झटकन् उठली. त्या व्यक्तीच्या एकाच पायावर तिने डोके ठेवले आणि त्या ठिकाणी फार मोठे कर्तृत्व असल्याची तिला जाणीव झाली. रमेश, ' आजपासून ही वेडी मीना ह्या पायाची दासी, ' असे म्हणून रमेशचा पाय तिने अश्रूंनी धुऊन टाकला व त्याबरोबर आपले मनसुद्धा.

इतक्यात कोठेतरी पाचचे टोले पडले. ऑफिस सुटल्याची व घरच्या कार्यक्रमाची मीनाला आठवण झाली. क्षणभरच ती विचलित झाली. तेवढयात रमेशने तिचे मुखकमल वर केले. स्वत:च्या हाताने अश्रु पुसून तिला बाहुपाशात बद्ध केले. त्याच्या डोळयाला डोळा भिडताच भावी जीवनाबद्दल विचार करण्यासच तिला फुरसत मिळाली नाही. कानात मात्र रेडिओवरील गाण्याचे ' शुभ मंगल सावधान बोलते मी आई जाण ' हे शब्द पडत होते.

□ □ ■


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

# सामाजिक एकात्मता परिषद

**महाड**

**प्रा. राम बिवलकर**

**दिनांक १९ मार्च १९७०**

रोजच्याप्रमाणे उठलो. प्रातकर्मे उरकली आणि पायात बूट चढवून हाती रॅकेट घेऊन मी बॅडमिंटन कोर्टाकडे जाण्याकरता दुचाकीवर पाय ठेवला. दोन मिनिटात वीरेश्वराच्या मदिराजवळ पोचलो. तिथे सारे मैदान 'केशरी' बनले होते. ठिकठिकाणी दीपांकित केशरी ध्वज उभे होते. प्रशस्त व्यासपीठ तयार होते. मधल्या ध्वजस्तभाच्या पायथ्याशी डॉ. आंबेडकरांची प्रतिमा स्थानापन्न झाली होती. कधी नव्हे ती नगरपालिकेला जाग येऊन त्या मैदानावर जलसिंचन चालू होते. रस्ते झाडून चकचकीत झाले होते. त्यावर पाणी मारण्यात आले होते. बाजारपेठेत शिरलो तर दुतर्फा केशरीध्वजाच्या गुढ्यानी सारी बाजारपेठ फुलली होती. चवदार तळयाच्या कोपऱ्यावर तर ध्वज-पताकांची गर्दी झाली होती. तिथेही डॉक्टरांच्या प्रतिमेला पुष्पहार घातला होता. गुढीपाडवा अजून पाऊण महिना दूर होता मग महाडनगरीत आज हे प्रसन्न वातावरण कसे अवतरले? महिन्याभरापूर्वी एकदा असा 'भगवा साज' एका रात्रीत नगरीवर चढला होता. पण तेव्हा वातावरण दवलेले, धुमसत असल्यासारखे वाटत होते. केव्हा ठिणगी पडेल ते सांगता येत नव्हते – पण आजची गोष्ट वेगळी होती. आज मने बधिरलेली नव्हती, आनंदित होती. हे काय आहे हे उमजायला वेळ लागला नाही. पण आश्चर्य वाटले.

१९ मार्चला भारतीय जनसंघाने महाडला सामाजिक एकात्मता परिषद आयोजित केली होती. तिचे [उद्घाटन माननीय श्री. भय्यासाहेब आंबेडकर करणार आहेत व प्रमुख वक्ते म्हणून कर्नाटक केसरी खासदार जगन्नाथराव जोशी उपस्थित राहाणार आहेत. पाहुण्यांच्या यादीत आमदार रामभाऊ म्हाळगी, उत्तमराव पाटील, सर्वश्री बाळासाहेब पळसपगार, मोतिरामजी लहाने वगैरे जनसघाची

उच्चपदस्थ मंडळीही होती. हे सारे ऐकले होते.

पण अलीकडे साऱ्याच राजकीय पक्षाची दलित वर्गाबद्दलची कणव उफाळून वर आलेलीही ठाऊक होती. साऱ्याची दृष्टी ७२ सालावर असल्याने ही परिषद हे पक्षीय व्यासपीठच असणार, त्यामुळे इतर जनसामान्यांप्रमाणे माझ्याही दृष्टीने परिषदेला फारसे महत्त्व नव्हते.

त्यामुळेच एका रात्रीत नगरीचे दर्शन आणि वातावरण, असे बदललेले पाहून आश्चर्य वाटले. गेली अनेक वर्षे १९ मार्च हा दिवस उगवत आला होता आणि उगवला तसा मावळलाही होता. कधी कधी या दिवशी २७ सालच्या स्मृती जाग्या होत. त्या दिवशीच्या लढाईत भाग घेतलेल्या म्हाताऱ्या शरीरांची पण तरुण मनांची उलघाल होई. पण तग तुमानीतल्या, टाइट साडी वा मिनी स्कर्टवाल्या तरुण पिढीला ना तिची जाणीव, ना आत्मीयता, ना खत ना खेद !

१९ मार्च १९२७ – बरोबर त्रेचाळीस वर्षांपूर्वी श्री. भीमराव रामजी आंबेडकर नामक एका तरुण महार बॅरिस्टराने महाडच्या कायस्थ मंडळीच्या सहकार्याने रूढीग्रस्त, महानिद्रिस्त, चातुर्वर्णाखाली आपल्याच देशबांधवांना पशूहून नीच वागणूक देणाऱ्या समाजपुरुषाच्या छातीवर सणसणीत लाथ मारली होती. चवदार तळ्याचे ' महासोवळे ' पाणी पददलितांना चाखायला दिले होते – आणि ते कुळ-चाभर पाणी पिण्यासाठी त्यांना भारंभार रक्ताची किंमतही मोजावी लागली होती. तो दिवस पददलितानी आपल्या माणुसकीच्या हक्कासाठी रणशिंग फुकल्याने पावन झालेला होता. ती सवर्णांबरोबर डॉक्टरानी उभ्या केलेल्या संघर्षाची नुसती पुकार नव्हती तर ' मी माणूस आहे. माणूस म्हणून जगण्याचा मला अधिकार आहे. मी मेलेले मास खाणार नाही – वतनाच्या नावाखाली भिक्षा मागणार नाही. दारचा कुत्रा होणार नाही ' अशी ६ कोटी पददलिताच्या मृतशरीरात त्राण फुकल्याची ती दुदुभी वाजत होती. महाडच्या आसपासचे शेकडो महार तरुण त्या दिवशी डॉक्टराच्या बडखोर क्रांतिध्वजाखाली येऊन उभे राहिले होते.

रा. ब. सीताराम केशव बोले यानी मुबई विधिमडळात संमत करून घेतलेला ठराव प्रत्यक्षात उतरविण्याच्या दृष्टीने महाड नगरपालिकेने आपल्या धडाडीच्या नगराध्यक्षांच्या – श्री. सुरबा नाना टिपणीसाच्या पुढाकाराने चवदार तळे स्पृश्या-स्पृश्याना खुले केले ते १९२६ साली. पण नगरपालिकेने ठराव केला म्हणून चवदार तळ्यासारख्या ब्राह्मणाच्या बालेकिल्ल्यात शिरून तो हक्क बजावण्याची कुणा अस्पृश्याची छाती होत नव्हती. अस्पृश्याचे हक्क आणि भवितव्य यावर अनेक परिषदात जोषदार भाषणबाजी झाली होती पण कृती घडत नव्हती. त्यामुळे विचाराना कृतीचे पाठबळ देऊन अस्पृश्याचा प्रश्न वेशीवर टांगण्याची गरज ओळखून डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यानी दि. १९–२० मार्च १९७० रोजी महाडला कुलाबा जिल्हा बहिष्कृत परीषद आयोजिली.

सुरबा टिपणीस, सुभेदार सवादकर, सभाजी गायकवाड, शिवराम जाधव, भाई अनंतराव चित्रे, रामचद्र मोरे इत्यादी पुढाऱ्यानी परिषदेची नौबत खेडोपाडी वाजविली. आणि त्या हाकेला ओ देऊन पधरा वर्षांच्या पोरापासून पाऊणशेची मजल गाठलेल्या थोरापर्यंत, विविध भागातली पाचसहा हजार अस्पृश्य मंडळी, पाठीवर भाकऱ्या बांधून परिषदेला हजर झाली. महाडच्या गाडीतळावर बांबू-झापाचा मंडप उभा झाला. स्पृश्यानी परीषदेला पाणी नाकारल्याने ४० रुपये खर्चून पाणी विकत घ्यावे लागले !

दि. १९।३।२७ ची सभा डॉक्टरसाहेबांच्या आवेशयुक्त, स्फूर्तिप्रद भाषणाने गाजली. सुरबा, चित्रे, भिडे, सहस्रबुद्धे, बापुराव जोशी आदी स्पृश्य मंडळीच्या ज्वलंत भाषणाने मेलेली मने जागी झाली. स्पृश्यानी अस्पृश्याना त्याचे नागरिकत्वाचे हक्क बजावण्यास साहाय्य करावे, त्यानी अस्पृश्याना नोकरीस ठेवावे, अस्पृश्य विद्यार्थ्यांचे वार लावावे, मेलेली जनावरे ज्याची त्याने ओढावी, अस्पृश्यांची पाण्याची अडचण दूर करावी, बहिष्कृत वर्गाची मेलेल्या प्राण्याचे मास खाण्याची चाल सरकारने कायद्याने बद करावी. शिक्षण व दारूबंदी याबावत अस्पृश्यांवर सक्ती करावी अशा आशयाचे दहा ठराव त्या दिवशी मजूर झाले.

दुसऱ्या दिवशी परिषद पुढे चालू झाली. आणखी काही भाषणे झाली. आणखी चार ठराव मजूर झाले. त्यातील एकान्वये स्वामी श्रद्धानदाच्या दु खद निधनानिमित्त दुखवटा व्यक्त करण्यात आला. दुपारचे बारा वाजले होते. ऊन रणरणत होते. साऱ्यांनाच तहान कासावीस करीत होती. भूकही भडकली होती. परिषदेचे काम सपत आले. आभार मानले गेले आणि सभा संपली असे अध्यक्षानी घोषित करायचे बाकी होते. तेवढ्यात अनतराव चित्रे उठले आणि म्हणाले, 'विकतचे पाणी किती पुरणार ! तहान लागली तर ती भागवायला दोन फर्लांगावरच्या चवदार तळ्यावर आपण जाऊ या. महाड नगरपालिकेचा ठराव प्रत्यक्षात उतरवू या' चित्र्याची घोषणा जनसामान्याना आणि काही स्पृश्य पुढाऱ्यांनाही अनपेक्षित होती ! पण जमलेल्या मडळीनी ती टाळ्याच्या गजरात उचलून धरली. अनेक ठरावावर जोषदार भाषणे करणारे काही वाचिवीर गळफटले पण बाबासाहेबाचे सहकारी आणि अनुयायी ते दिव्य करायला उभे ठाकले. चाराचाराच्या तुकड्यानी सभेचे मोर्चात रूपातर झाले आणि तो चवदार तळ्याची वाट चालू लागला.

चवदार तळ्याचे पाणी पशू पीत, पक्षी पीत, इतकेच काय पण गोमासभक्षक मुसलमानांना तळे खुले होते, ख्रिस्त्याना बदी नव्हती. पण युगानुयुगे राम-कृष्ण-विठोबाला जाणाऱ्या अस्पृश्य-हिंदूना मात्र तळे बंद होते. त्याना पाणी दिले तर स्पृश्याचा धर्म बुडणार होता !

राजकीय मोर्चे रोमहर्षक असतात. नेत्रदीपक असतात. तिथे पुढारीपणाची बिरुदावली मिरवण्यात मोठेपणा असतो. देशभक्ती—स्वातंत्र्यप्रीती यांना आगळे

स्थान असते. राजकीय स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या वीरांच्या मार्गावर लोक तोरणे उभारतात, सुमने उधळतात. सहानुभूती दर्शवितात, मदतही करतात. पण सामाजिक क्रांती घडवू पाहाणाऱ्या महाभागाच्या भाळी काठ्या, दगडधोंडे येतात. निंदा नालस्तीला त्यांना तोंड द्यावे लागते, स्वत च्या प्रेतयात्रा स्वत च पाहव्या लागतात. समाजातील घातुक परपरा, अमानुष चालीरीती, रूढीप्रिय धर्मवेडेपणा याचा नायनाट करायला निघालेल्याना रूढीप्रिय बहुजनाच्या क्रोधाग्नीत बळी पडावे लागते. त्यामुळे आबेडकराच्या या मोर्चात राहिले त्याचे दलितवर्गीय बाधव आणि खरे तळमळीचे स्पृश्य सहकारी !

डॉ. आबेडकर तळ्यावर पोचले. क्षणभर थाबले. युगायुगाची बधने तोडायची होती. आत्मोद्धाराचा मार्ग आपल्या बाधवाना स्वकृतीने दाखवायचा होता. त्यातून त्यांना प्रतिकारक्षम बनवायचे होते. दृढनिश्चयाने या महामेरूची पावले तळ्याच्या पायऱ्या उतरली. ओंजळीने तळ्यातील पाणी पोटभर प्याली. कृतकृत्यतेचे समाधान मुखी विलसत होते. त्याच्या हजारो बाधवानी आपल्या नेत्याचे अनुकरण केले. चवदार तळ्याचे पाणी त्यादिवशी खरे पावन झाले. ' चवदार ' झाले.

तो दिवस २० मार्च १९२७ हा. भारताच्या चारपाच सहस्र वर्षांच्या इतिहासातील महन्मगल दिवस. माणुसकीचा, समतेचा आणि एकात्मतेचा सदेश भारताला देणारा तो सोनियाचा दिवस ! डॉ. आबेडकराच्या जीवनातील परमभाग्याचा दिवस.

चवदार तळ्याचे पाणी पिऊन मोर्चा परतला काहीजण घरोघरी रवाना झाले. बाहेरगावची मडळी बाजारहाट करण्याकरता बाजारात शिरली. काही मडळी व बायकामुले परिषदेच्या मडपाकडे परतली. भोजनोत्तर सर्वांनीच मडप सोडायचा होता.

एवढ्यात, अस्पृश्यानी चवदार तळे बाटवले व ते आता वीरेश्वरालाही बाटविणार आहेत अशी आवई उठली एकादा बुदशिकन् महमद हातोडा घेऊन वीरेश्वराची पिंडी फोडायला आला असता तर दाराला कड्या लावून जी मडळी स्वस्थ बसली असती त्याना धर्म बुडाल्याची जाणीव झाली–देव बाटेल याची भीती पडली आणि ते त्याच्या रक्षणार्थ लाठ्या, काठ्या, भाले, बरच्या घेऊन बाहेर पडले. चोरका म्हार, रोहिदास चाभार, सेना न्हावी, गोरा कुभार याची सेवा करून जो देव बाटला नाही. तो अस्पृश्यानी दर्शन घेतले तर बाटणार होता !

मडपात भोजनात गुतलेल्या बायकापोराना व जाणत्या बापयाना या क्रूर घटनेची चाहूल लागली नव्हती. त्याच्यावर अचानक महाभयकर हल्ला झाला. सापडेल त्याची डोकी फोडली. बायाबापड्याना आणि मुलानाही सोडले नाही. जेवणाची पाने उलथली. भाडी फोडली, अन्नात माती कालवली, सापडेल त्याला भुईसपाट केला ! बाजारात फिरणाऱ्या मंडळीनाही झोडपण्याचा एकच सपाटा

उडाला. अस्पृश्याना अविधाच्या घरात आश्रय मिळाला पण हिंदूच्या घराची कवाडे बद राहिली.

डाक बगल्यावर नानासाहेबाना हे कळले-त्यानी तळयावर जाऊन चौकशी केली. मार पडलेल्याना औषधपाणी, मलमपट्टीची व्यवस्था केली-पण मलमपट्टी करीत असतानाही त्याना ऐकून घ्यावे लागले, "पाणी प्यायला पाहिजे ना ? घ्या !"

राष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेचा प्रवाह व डॉ. आबेडकराच्या जीवनाचा प्रवाह ह्याना वळण देणारी ती अभूतपूर्व अशी घटना होती. वगभगाची चळवळ, टिळकाचा सुरत-सग्राम, वीर सावरकराची मार्सेलिसजवळची त्रिखडात गाजलेली उडी, गाधीजीची दाडीयात्रा, खुदिराम बोसानी फेकलेला पहिला बाँब आणि सुभाषबाबूचा शेवटचा सग्राम, या घटनानी आधुनिक भारताच्या राजकीय इतिहासाला जशी महत्त्वाची कलाटणी दिली तशीच कलाटणी, नव्हे काकणकर सरस अशी कलाटणी या महाडसंगराने भारताच्या सामाजिक पुनर्रचनेच्या कार्याला दिली.

शतकानुशतके स्पृश्य हिंदूच्या दास्यात जखडलेला अस्पृश्य समाज आपले मानवी हक्क प्रस्थापित करण्यासाठी स्पृश्य हिंदूच्या समोर दंड थोपटून उभा ठाकला. वीर सावरकरानी त्याची पाठ थोपटून घोषित केले,

" आपल्या धर्मबाधवा'ना निष्कारण पशूहूनही अस्पृश्य लेखणे हा मनुष्य जातीचाच नव्हे तर आपल्या आत्म्याचाही घोर अपमान करणे होय. त्या अन्याय्य आणि आत्मघातकी रूढीचे आपद्धर्म म्हणून नव्हे तर धर्म म्हणून, लाभकारक म्हणून नव्हे तर न्याय म्हणून, उपकारक म्हणून नव्हे तर माणुसकीची सेवा म्हणून, हिंदूनी निर्दालन केले पाहिजे. आपल्या धर्माच्या आणि रक्ताच्या हिंदू मनुष्याच्या स्पर्शाने पाणी बाटते आणि ते पशूचे मूत्र शिंपले की शुद्ध होते, ही भावनाच तिरस्करणीय आहे "

त्यानतरच्या तीस वर्षांच्या काळात अस्पृश्याना माणसासारखे जगता यावे, त्याचे आर्थिक उत्थान व्हावे, समाजात 'न्याय' मिळावा, राजकीय हक्क मिळावे म्हणून डॉक्टरानी जीवाचे रान केले अगदीच निभले नाही तेव्हा धर्मांतर केले. पण कोणतीही गोष्ट करताना, 'रूढीच्या दृढ चौकटीपायी जातिभेद व अस्पृश्यता निर्माण झाली, व त्यामुळे हिंदू समाजाची शक्ती क्षय पावली आहे. समाजपुरुषाच्या एका महत्त्वाच्या अवयवाची कर्तृत्वशक्ती नष्ट झाली आहे. त्या अस्पृश्य मडळीना समान वागणूक देऊन त्याना कर्तृत्वाची द्वारे खुली केल्यास हा समाज बलदड ठरेल.' ही विचाराची बैठक त्यानी सोडली नव्हती.

स्वातत्र्यपूर्व काळात अस्पृश्यानी ब्रिटिशाची इमानेइतबारे चाकरी करूनही त्याना सामाजिक,आर्थिक व राजकीय न्याय देण्याबाबत ती सभा उदासीनच होती. स्वातत्र्योत्तर काळात समाजाचे एकसधीकरण घडेल असे वाटले होते; पण सत्ता-

स्पर्धेत अस्पृश्यांना व अल्पसंख्यांकांना चुचकारीत राहावे, आपरी तुंबडी भरून घ्यावी यापलीकडे राजकर्त्यांना त्या प्रश्नाचे सोयरसुतक वाटले नाही. कायदे केले पण त्यांची हिरीरीने अंमलबजावणी झाली नाही, कारण अखेर शेवटी बहुसंख्य राज्यकर्ते स्पृश्य आणि त्यांची धोरणे चामडी बचाऊच ठरली. समाजसुधारणेला बळ हत्तीचे लागते. पण प्रगती मात्र मुंगीच्या पायांनी वाटचाल करते. त्यामुळे या खंडप्राय देशातील बहुसंख्य समाज एकसंध झाला नाही—तसा प्रयत्नच झाला नाही. राजकीय अस्थैर्य बळावले आणि या स्वतंत्र देशाचे तारु पुन्हा एकदा प्रलयंकारी पारतंत्र्याच्या खडकावर आपटून फुटणार तर नाही ना ? अशी सार्थ शंका विचारी माणसांच्या मनात घर करू लागली.

त्याचेच प्रतिबिंब भारतातील विविध राजकीय पक्षांनी समतेची व दलितांची हाकाटी पिटण्यात आज दिसून येत आहे.

'हिंदूसमाज एकात्म करण्याच्या प्रश्नाचे आम्ही राजकीय भांडवल करू इच्छित नाही, पण या समाजातील जातीपाती तोडून, तो एकवर्णी केल्याविना या राष्ट्राची प्रगती संभवणार नाही याची जाण ठेऊन माणुसकीच्या भावनेने आम्ही हा प्रश्न धसास लावणार आहो'—ही भारतीय जनसंघाची धारणा दिलासा देणारी वाटली.




त्या प्रयत्नांची मुहूर्तमेढ, महाडसारख्या धर्मक्षेत्री व कुरुक्षेत्री, करण्याचे ठरविण्यात व त्याकरता १९ मार्चचा मुहूर्त साधण्यात व परिषदेचे उद्घाटक म्हणून माननीय श्री. भय्यासाहेब आंबेडकरांना निमंत्रिण्यात जनसंघाने दाखविलेले औचित्य वाखाणण्यासारखे खचित आहे.

'हिंदू समाजात 'समता' आणण्याचेच फक्त आमचे उद्दिष्ट नाही. कारण समतेत सारखेपणा आहे पण द्वैतभावही आहे. त्याच्या पुढे जाऊन आम्हाला या समाजात 'एकात्मता' भाव जागृत करायचा आहे. हे कार्य कायद्याने होत नाही हे गेल्या २२ वर्षात दिसून

आले आहे. कारण त्या कायद्यांना सामाजिक प्रेरणेचे अधिष्ठानच नाही. ती जनजागृती आम्ही करणार आहोत ' ही परीषदेत व्यक्त झालेली भूमिकाही स्पृहणीय आशीच आहे.

प्रश्न आहे तो भाषणबाजीचा नसून प्रत्यक्ष कृतीचा आहे. ४३ वर्षांपूर्वी डॉक्टर आंबेडकरांनी कृती कशी निर्भय असावी हे दाखवून दिले; पण कृती करणे महाकर्म कठीण असते हेही त्या उदाहरणाने सिद्ध केले आहे. सामाजिक सुधारणेचे धुरीण व्हायचे म्हणजे वाचाळते पेक्षा कृती महत्त्वाची. १९ मार्चच्या (१९२७) सभेत संमत झालेले ठराव प्रत्यक्षात उतरवायला आम्ही आहो का तयार? अस्पृश्याशी रोटीबेटी व्यवहार करायला किती माणसे पुढे येतील? त्याना स्वयंपाक घरापर्यंत अगर देवघरापर्यंत यायला किती देतील? पाणवठे, घरे, बिऱ्हाडे सरमिसळ वस्तीत मिळवून देणे किती कठीण आहे? या सर्व प्रश्नाना डॉक्टर साहेबाना तोंड द्यावे लागले होते आणि हात टेकायची पाळी आली होती.

त्यामुळे जनजागृतीबरोबर ही समाजसुधारणा कटाक्षाने पाळणारी एक संघटना उभी व्हायला हवी.–मी घरात अस्पृश्याचा वावर ठेवीन. रोटीबेटी व्यवहार त्यांच्याशीच ठेवीन. त्याच्याच हातचे अन्नोदक घेईन–अशाच काहीशा प्रतिज्ञा घेतलेले या संघटनेचे कार्यकर्ते गावोगावी–खेडोपाडी निर्माण करायला हवेत. अंतरे फार दुरावली आहेत ती एकसंध करायची आहेत. त्याकरिता परिस्थितीची आच लागेल, अथवा प्रयासाचे पाठबळ लागेल. दृढनिश्चयाचे घण समाजपुरुषाच्या ऐरणीवर हाणावे लागतील, तरुणाची मने चेतवून तो अग्नी या सयोगार्थ प्रज्वलित करावा लागेल.

पण अशी काही या चळवळीची बांधणी तयार करायची तीव्र इच्छा असल्याचाचून या परिषदा फक्त ठराव करतील त्यातून निष्पन्न काहीच निघणार नाही.

महाडच्या १९।३ च्या सभेत तसा दिलासा, तो आत्मविश्वास माननीय जगन्नाथ रावजीनी आणि आमदार रामभाऊ म्हाळगीनी बोलून दाखविला आहे. २७ सालच्या सगरात भाग घेतलेल्या ज्या अकरा वीराचा सत्कार परिषदेतर्फे करण्यात आला त्याना "आणखी पाच दहा वर्षे जगा–तुम्हाला याची देही याची डोळा एकसंध हिंदूसमाजाचे हे चित्र आम्ही दाखवूच दाखवू" असेही सागण्यात आले आहे.—

यात या मडळीना यश येवो आणि "धारणाद्धर्मः यतोऽभ्युदय निःश्रेयस सिद्धिः स धर्मः।" हे धर्माचे स्वरूप सर्वार्थाने सिद्ध होवो हीच इच्छा–

□ □ □

# राजधानीतील समता धरणे

पन्नालाल सुराणा

गजबजलेल्या मुंबईतला हुतात्मा चौक, प्रासादतुल्य इमारती चारी बाजूनी दिमाखाने उभारलेल्या. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्याकडे मेहेरनजर टाकायलाही सवड नसलेल्या. जाणाऱ्यानाही तशीच घाई लागलेली. मोटारी, बसेस, टॅक्सी, नुसत्या पळताहेत. चौकातील वाहतूक-बेटात कामवाल्याच्या मोटारी हारीने लागलेल्या. त्यात कशीतरी जागा करून एक मडप उभारलेला. त्यावर लाल झेंडे डोलत होते मडपावर बोर्ड लकाकत होता. 'सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांना पाठिंबा द्या.' आत बसले होते विनायकराव कुलकर्णी, अनतराव भालेराव, रघुनाथ कोष्टी, चिमूरचे सरपंच गोपाळराव कोरेकर, अमरावतीचे बापूसाहेब कारजकर, कोल्हापूरचे बापूसाहेब पाटील, नागपूरचे रामराव वाघुळे, बिलोलीचे गगाधर पटणे, नादेडचे सुधाकर डोईफोडे, सेलूचे गोविंद काळेगावकर आणि विनायकराव चारठाणकर...त्यानी धरले होते धरणे. चोवीस तासाचे. विधानसभेच्या दाराशी. मुख्यमंत्र्याच्या कार्यालयासमोर, आणि समाजाच्या पायाशी.

बसले होते कार्यकर्ते समतेची पत्रके वाटीत. लगबगीने जाणाराला अडवून त्याच्या हातात कागद कोबीत होते. आपल्या उद्योगधद्यातून दोन मिनिटे डोके काढून समतेचा विचार समजून घ्यावा, पददलिताच्या न्याय्य मागण्या ऐकाव्यात, या प्रजासत्ताकाच्या खऱ्या धन्याला देशाच्या सत्ता-सपत्ती-प्रतिष्ठेत समान वाटा मिळवून देण्यात आपलेही काही कर्तव्य आहे याची जाण धरावी अशी विनती करीत होते. कशासाठी हा सगळा वेडाचार चालत होता ?

१ ऑक्टोबरला प्रचड जनता मोर्चाने मुख्यमंत्र्याना दलिताच्या मागण्यांचे निवेदन दिले होते. मुख्यमंत्र्यानी त्यातील मागण्या सबधीत खात्याकडे पाठवल्या होत्या. खात्याकडून कचेरीकडे उत्तरे आली. 'तुमच्या मागणीचा विचार चालू आहे.'

सहकारी धान्य–दुकानात दलिताना पंचवीस टक्के जागा राखून ठेवाव्यात ही मागणी समजली. पण ती धान्य–दुकाने आमच्या अखत्यारात नसल्याने तुमच्या मागणीचा विचार करता येत नाही.' अशी दप्तरछाप उत्तरे निदान दलिताच्या मागण्याना तरी मिळायला नको होती. संसोपा चिटणीस साथी वसत उपाध्येनी ता. ३० जानेवारीला मुख्यमत्र्याना पत्र लिहून समता निवेदनातील मागण्यावर मंत्रिमडळानेच निर्णय घ्यावा अशी विनती केली. सव्वा महिना वाट पाहिली. मुख्यमत्र्याकडून उत्तर आले नाही. तेव्हा मुख्यमत्र्यासमोर चोवीस तासाचे धरणे धरावयाचे ठरले. पक्षाच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष श्री. ब्रिजलाल पाटील व चिटणीस वसत उपाध्ये यानी हा निर्णय पत्रकारासमोर जाहीर करताना म्हटले,

"शासनाने कणखरपणे काही पावले निकडीने टाकली पाहिजेत. ज्या आठ हजार खेड्यात दलितासाठी पिण्याच्या पाण्याची सोय नाही तेथे ती तावडतोब करणे, खेड्यात गावठाण वाढवून व शहरात झोपडपट्टीला पर्यायी जागा देऊन निवाऱ्याची सोय करणे, सहकारी व राष्ट्रीकृत बँकामार्फत किमान १५ टक्के कर्ज पुरवठा दलिताना उद्योगधद्यासाठी तारणाशिवाय करणे, वीस टक्के पोलीस पाटील दलितापैकी नेमणे, एस टी. कॅटीनचे कत्राट त्याना देणे–यासारखे उपाय फारसा खर्च करावा न लागता तातडीने अमलात आणणे शक्य आहे. अस्पृश्यता कायद्याखाली होणाऱ्या गुन्ह्याबाबत पोलिस यत्रणेकडून सध्या असलेली दिरंगाई थाववणेही आवश्यक आहे.

सामाजिक समतेच्या प्रश्नावर सर्वांचे शाब्दिक एकमत असले तरी व्यवहारात त्या दिशेने फार कमी पावले पडत आहेत. समाजातील सुशिक्षित बोलका वर्ग आणि राजकीय कार्यकर्ते यानी दलितावरील परपरागत अन्याय नष्ट करण्यासाठी खबीरपणे स्थानिक पातळीवर काम केले पाहिजे. सार्वजनिक आडावर त्याना पाणी भरू देण्यासाठी गावातील प्रभावशाली व्यक्तीचा प्रसगी रोष पत्करूनही उभे राहणे, नोकरी धद्यात त्याच्यासाठी असलेल्या राखीव जागा भरल्या जातील व शैक्षणिक सवलती वेळेवर मिळतील यावर कटाक्ष ठेवणे, प्राथमिक दलित मुला-मुलीना पाठ्यपुस्तके वेळेवर मिळतील असे पाहणे, जि. प. दवाखान्यात त्याना टाळले जाणार नाही यासाठी प्रयत्न करणे, अशा स्वरूपाची कामे सवेदनाशील नागरिकानी करण्याची गरज आहे

समाजातील सुजाण वर्गांना व शासनाला या गोष्टीची पुन्हा एकदा जाणीव करून देण्यासाठी स. सो. पा. चे राज्य समितीचे सभासद डॉ. बापूसाहेब काळदाते, सदाशिवराव बागाईतकर, विनायकराव कुलकर्णी, बा. न. राजहस आदी प्रमुख कार्यकर्ते, जिल्हा चिटणीस, सोमवार तारीख ९ मार्चला सकाळी ११ वाजता हुतात्मा स्मारकाजवळ चोवीस तासाचे धरणे धरणार आहेत. प्राचार्य मे. पु. रेगे याच्या अध्यक्षतेखाली समता मोर्चा समितीने या कार्यक्रमाला पाठिंबा दिला असून

युवक क्रांती दलाचे कार्यकर्तेही त्यात सामील होणार आहेत.

गेले दोन महिने स. सो. पा. चे कार्यकर्ते ठिकठिकाणी समानतेच्या विविध प्रश्नावर चळवळी करीत आहेत. गेल्या प्रजासत्ताक दिनी पुण्याला प्रचड मोर्चा काढण्यात आला. बार्शी, माढा व पढरपूर येथून निघालेल्या पायी तुकड्यांनी ३० जानेवारीला सोलापुरात एकत्र येऊन मोर्चा काढला, व जि. प. अध्यक्षाना आणि कलेक्टर याच्याकडे सुमारे ६० खेड्यातील दलिताच्या अडचणीविषयीचे निवेदन सादर केले. हिंगोली, सेलू व वसमत येथून निघालेल्या पायी तुकड्यानी १३ फेब्रुवारीला परभणी येथे जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा नेला. खेऊर व कुरुंदवाड येथील साखर कारखान्यावर मोर्चे नेण्यात आले. यापुढे स्थानिक पातळीवर अधिक तीव्रतर चळवळी करण्याचे कार्यक्रमही आखण्यात आले आहेत. त्याच्या संघर्षा-मागील भूमिका सर्व समाजाला नीट समजावणे व स्थानिक कार्यकर्त्यांच्या पाठीशी राज्य पातळीवर सघटित शक्ती उभी करणे या धरण्यातून साध्य व्हावे अशी आशा आहे.

समता विचारांशी सहमत असलेल्या सर्व नागरिकानी, वृत्तपत्रांनी व संघटनांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे व सत्ताधाऱ्यानी आपल्या घोषणा आणि आश्वासने तात्काळ साकार करावीत अशी विनती करण्यात येत आहे."

या निर्णयानुसार ता. ९ मार्चला सकाळी ठीक १० वाजता आमदार निवासातून मोर्चा निघाला. छोटासा पण निर्धाराने ओतप्रोत भरलेला, 'जातीपाती नष्ट करा, चातुर्वर्ण्य गाडून टाका, पददलिताना न्याय द्या, हम सब एक है, हिंदु मुस्लीम एक है, मराठा–महार एक है, ब्राह्मण भंगी एक है, अशा घोषणा देत देत बापूसाहेब काळदाते, मृणाल गोरे वगैरे नेते एका हाताने बॅगा साभाळीत दुसऱ्या हाताने झेंडे उच धरून मोर्चाचे नेतृत्व करीत होते. चर्चगेट समोरून हा मोर्चा हुतात्मा स्मारका-पाशी आला व मडपात स्थानापन्न झाला. भेटण्यास येणाऱ्याची राग सकाळपासून सुरू झाली. सामाजिक समता परिषदेचे श्री. दादासाहेब रूपवते आले नि म्हणाले, 'भलतीच चिकाटी धरली आहे. पण सत्ताधाऱ्याना पाझर फुटणार का ?" बापू-साहेब पाटील म्हणाले, 'त्याचा कानोसा तुम्हालाच लवकर लागणार.' एल. आय. सी. युनियनचे कार्यकर्ते श्री. अप्पा कुलकर्णी आपल्या अनेक सहकाऱ्याना घेऊन आले. विदर्भातील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. मगनलाल बागडी, प्रसोपाचे प्रा. ग. प्र. प्रधान व आमदार हाथनकर, प्रा. अ. भि. शहा व श्रीमती जसोदबेन शाहा, लाल निशाण गटाचे श्री. दत्ता देशमुख व यशवंत चव्हाण आदी मडळीनी अगत्याने येऊन समता मागण्याना पाठिंबा व्यक्त केला.

मधल्या जेवणाच्या सुट्टीच्या वेळी करण्याचे निवेदन मोठ्या प्रमाणावर वाटायला कार्यकर्ते कोपऱ्या कोपऱ्यावर उभे राहिले होते. दहा हाजार जाहिराती वाटण्यात आल्या. परतल्यावर पटणे म्हणाले, 'काहीजण उत्सुकतेने घेतात. पण काही जण

तसेच घाईघाईने अंगावरून पुढे जातात. त्याना काही कदरच वाटत नाही. आमच्या गावात असे होत नाही. आमची जाहिरात तेथे अतिशय आपुलकीने वाचली जाते.' विलोली गावातील तरुण उमदे वकील व ससोपाचे झुझार नेते याना विलोली-सारखा अनुभव मुंबईत कसा येणार ? मी त्याना म्हटले, 'अहो, या मुंबईत किती जाहिराती दररोज वाटल्या जातात ! लोकाना आधीच उद्योगधंद्याची, जेवणा-खाण्याची घाई असते. जाहिरात घेण्यासाठी दोन तीन सेकंद थांबणे हे येथे सगळ्यानाच परवडणारे नाही.'

पण अनेकजण तास अर्धातासाची सवड काढून येत होते, बसत होते, मुख्य-मंत्र्याना लिहिलेले पत्र वाचीत होते, चर्चा करीत होते, साचलेल्या काही कामाचा विचारही चालला होता. उपाध्येची लेखणी पेशवाई थाटाने कामगिरी बजावीत होती. भाई वैद्य अनेकाची गाऱ्हाणी समजावून घेऊन त्याना वाटेला लावीत होते. अनंतरावाची रसवती वहात होती. गोविंद कालेगावकर व दत्ता भोसले याच्या साईड कॉमेंटस् चालल्या होत्या. पाचच्या सुमारास मृणालताई चुकचुकून उद्गारल्या, "अहो, आज कार्पोरेशनमध्ये माजी मेयर डॉ. कुलकर्णीचे सभासदत्व रद्द करण्याचा ठराव मांडायला कमिशनरला कोणी मिळाले नाही. बाकी सर्व पक्षाच्या लोकानी शेपूट घातले. मला जाता आले नाही याची चुटपूट लागली आहे."

पावणेसहाला जाहीर सभेला सुरुवात झाली. प्राचार्य मे. पु. रेगे यानी प्रास्ता-विकात म्हटले की, 'हे धरणे मुख्यमंत्र्यासमोर, विधानसभेच्या समोर आहे तसे सगळ्या समाजाच्याही पायाशी आहे. अशा कार्यक्रमात भाग घेण्यात मी माझा वेळ का घालवतो असे काही मित्र मला विचारतात. केवळ अध्ययन–अध्यापन हे मला जीवनसर्वस्व वाटत नाही. सामाजिक परिवर्तनाच्या क्रांतियज्ञात आपणही एखादी समिधा टाकावी असे वाटते म्हणून मी अशा कार्यक्रमात भाग घेतो.' त्यानंतर बापूसाहेब काळदाते बोलायला उठले. समोर जेमतेम साठ सत्तर लोक बसलेले. ऑफीस सुटल्याने मोटारी, बसेसची धावपळ सुरू झालेली; पण बापू-साहेबाच्या भाषणाची जादू क्षणात प्रगटली. चार-पाच हजाराचा श्रोतृवर्ग हा हा म्हणता जमला. बापूसाहेबही खूप चिडून बोलत होते. 'नवे सत्ताधारी माजले आहेत, ऐऱ्यागैऱ्याविषयी त्याना काही प्रेम वाटत नाही. पण हे फार काळ चालणार नाही. आम्हाला समाजपरिवर्तन घडवायचे आहे. सबंध समाजाच्या भाड्याखाली प्रचंड जाळ लावायचा आहे. समाज तापू लागला की, तळचे थर वर जातील, वरचे खाली येतील, प्रचंड घुसळण चालू होईल, त्यातूनच समाजाचे तपमान वाढून सर्वांना समान संधी देण्याच्या मनोवस्थेला जाता येईल.' नंतर प्रा. चंपाताई लिमये, युक्रांदचे गोपाळ दुखंडे, याची भाषणे झाल्यानंतर प्रसिद्ध कथालेखक बाबूराव बागूल बोलले. ते म्हणाले, 'पहिल्यादाच मी भाषण करतोय. पण काय बोलू ? या समता धरण्याला अभिवादन करायला आलो आहे. खरे तर

माझ्यासारख्याला या देशात, या समाजात रहावेसे वाटत नाही. वाटते, निघून जावे दूर कोठे तरी – या जुन्या रूढीच्या डबक्याला लाथ मारून. पण जावे कोठे ? आणि कोण जाऊ देणार ? दुसऱ्या देशाला जायला पासपोर्ट कसा मिळणार ? म्हणून नाईलाजाने इथे रहातो. इथे राहायचे तर माणुसकीचे अधिकार, संसोपा-सारख्यांच्या बरोबर खांद्याला खांदा लावून लढवून, मिळवावे लागणार.' सुप्रसिद्ध कवी नारायण सुर्वे व प्रा. दया पवार यांनी आपल्या मोजक्या चरचरीत कविता म्हटल्या. अनंतराव भालेरावांनी मराठवाड्यातील काही घटना सांगून समता लढ्याची निकड प्रतिपादली. सभा संपली.

मग सुरू झाली गंगूकाका आणि भानू वकील यांची धावपळ. धरणेवाल्यांना खाऊ घालावयाचे होते. शुद्ध तुपातील पुऱ्या, बटाट्याची भाजी व मिरची यांची पाकिटे घेऊन ते लगबगीने आले. मंडळींनी कोंडाळे करून जेवण उरकले. तो एक कलापथक हजर. कमलाकर सुभेदार यांचे विद्यार्थी गिरकर आणि पार्टी या बालशाहीरांचा चमू साजशिणगारासह आला होता. समता वीरांना मुजरा करून त्यांनी आपला कार्यक्रम सादर केला.

रात्री बारा वाजता मंडळींनी तेथेच पथाऱ्या पसरल्या. हुतात्मा स्मारकाच्या शेजारी पहुडताना अनेक स्मृती मनात नाचत होत्या. पुढील कार्यक्रमाविषयी नवनव्या कल्पना सुचत होत्या. तशातच झोप लागली.

सकाळी दोन तास पुढील कार्यक्रमावर सांगोपांग चर्चा झाली. ग्रामीण भागात वसती सरमिसळ करणे, सार्वजनिक आडावर दलितांना पाणी भरण्याची व्यवस्था निर्धोक बनविणे, शहरातील स्मशानभूमिवरील जातीभेद नष्ट करणे या मागण्यां-वर मोजक्या केंद्रांवर प्रखर संघर्ष करण्याचे ठरविण्यात आले. राष्ट्रगीत होऊन धरणे उठले.

आणि १० मार्चला दुपारी मुख्यमंत्र्यांचे पत्र आले...' तुमच्या मागण्यांवर विचार चालू आहे...'





बरेचसे
अबोल
असलेले
हंसाबाईंचे हे चरित्र
अत्यंत
बोलके
आहे.

वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

किंमत : आठ रुपये
राजहंस प्रकाशन

अनंत भावे





# दोन

'बिस्मार्क'ची वार्ता प्रथम मिळाली तेव्हा टोव्हींच्या आधिपत्याखाली असलेल्या गृहसंरक्षक नौदल विभागात किंग जॉर्ज द फिफ्थ आणि प्रिन्स ऑफ वेल्स या युद्धनौका, लढाऊ क्रूझर हूड, दहा क्रूझर्स आणि बारा विनाशिका असा काफिला होता. त्यात पुढे रिपल्स नावाची लढाऊ क्रूझर आणि व्हिक्टोरियस ही विमानवाहू नौका यांची भर पडली होती.

'बिस्मार्क'चा शोध अजून लागला नव्हता. आणि शोध लागल्यावरही, माग काढणाऱ्या ब्रिटिश शिकारी नौकांना, महासागराच्या हजारो चौरस मैलांच्या अफाट विस्ताराचा फायदा घेऊन ती गुंगारा देऊ शकत होती. तसे घडू नये म्हणून टोव्हींना जाळे दूरवर फेकावे लागणार होते. त्यासाठी जितक्या मिळतील तितक्या नौका त्यांना पाहिजे होत्या.

वर्षानुवर्षे नौदलाची झालेली हेळसांड आता भोवत होती. हाताशी असलेल्या काफिल्याची स्थिती फारशी स्पृहणीय नव्हती. विमानवाहू व्हिक्टोरियसचे बारसे होऊन अवघे दोन महिने झाले होते. 'बिस्मार्क'चे संकट उभे राहिले त्यावेळी व्हिक्टोरियस जिब्राल्टरला जायला निघाली होती. तिच्यावर सहा फुलमार जातीच्या आणि नऊ सोर्डफिश जातीच्या विमानांचा ताफा होता. सोर्डफिशचे वैमानिक



अनुभवी आणि कुशल असले तरी फुलमारचे वैमानिक व निरीक्षक अननुभवी आणि कच्चे होते. युद्धाचा प्रत्यक्ष अनुभवच त्यांना नव्हता! नौकेच्या डेक-विमानतळावर विमान उतरवण्याचे शिक्षण त्या वैमानिकांना मिळालेलेच नव्हते!

रिपल्स आणि हूड या वीस वर्षांच्या जुनाट नौका होत्या. त्यांना अद्ययावत करण्याकडे दुर्लक्ष झाले होते. त्यांचे चिलखत तकलादू होते. त्याचे प्रत्यंतर हूडच्या बाबतीत लवकरच येणार होते. रिपलसदेखील आणखी दीड वर्षाने मलायाजवळ जपान्यांच्या बॉम्बहल्ल्यात सहज समुद्रतळाशी जाणार होती.

प्रिन्स ऑफ वेल्स ही शाही नौदलाची कोरी करकरीत युद्धनौका होती. पण तिचा कोरेपणाच धोकादायक होता. तिलाही पाण्यात उतरून दोनच महिने झाले होते. तिचा कर्णधार होता कॅप्टन लीच. त्याची प्रिन्स ऑफ वेल्सवरील यंत्रसामग्रीची पाहणी अजून पुरी व्हायची होती. प्रिन्स ऑफ वेल्सच्या चिलखताची मजबुती अजून पारखली गेली नव्हती. नौकेवरील गोलंदाजांना अजून युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव नव्हता. सगळ्यात विलक्षण गोष्ट म्हणजे स्कापा फ्लोहून ‘ बिस्मार्क’च्या शिकारीत भाग घेण्यासाठी निघालेल्या या नौकेवर अजून कित्येक नागरी कामगार होते! यावरून तिच्या नवीनपणाची कल्पना येते.

आरमारी युद्धविशारदाच्या मते प्रिन्स ऑफ वेल्सला युद्धात लोटायलाच नको होते. परतु ही वेळ आणीबाणीची होती. म्हणून दर्यासारंगाकडून कॅप्टन लीचला विचारणा झाल्याबरोबर त्याने युद्धात भाग घेण्याची तयारी दर्शवून, होती त्याच स्थितीत प्रिन्स ऑफ वेल्स युद्धपटावर ढकलली. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की लढाईच्या एका टप्प्यावर प्रिन्स ऑफ वेल्सनेच 'बिस्मार्क'वर बाजू उलटवली.

किंग जॉर्ज द फिफ्थ ही एकच युद्धनौका 'बिस्मार्क'शी चार हात करण्याच्या तोलामोलाची होती.

शिकारीचे हाकारे उठले आणि इतरही नौका शिकारीत सामील झाल्या. आणि अखेर शिकार साधली तोपर्यंत एकूण पाच युद्धनौका, तीन लढाऊ क्रूझर्स, बावीस विनाशिका, चौदा क्रूझर्स, दोन विमानवाहू नौका, दोन पाणबुड्या आणि पाच ट्रॉलर्स इतके सामर्थ्य ब्रिटनला एकवटावे लागले होते.

आणि तरीही सावज जवळजवळ निसटलेच होते !

'बिस्मार्क' ही त्या काळातील सर्वांत सामर्थ्यशाली युद्धनौका होती. शिवाय तिच्या एवढ्या इतर नौकापेक्षा तिचा वेगही अधिक होता. तिच्या तत्रज्ञांनी तर तिला 'अजिक्य' ठरवले होते. तिच्यावरील तोफखाना अद्ययावत होता. सामान्यतः पहिल्याप्रमाणे दुसऱ्या महायुद्धातही जर्मनाची गोलंदाजी ब्रिटिशापेक्षा अधिक प्रभावी होती. 'बिस्मार्क'वरील लक्ष्याचा पल्ला निश्चित करणारी यत्रयोजनाही अत्यंत कार्यक्षम होती. त्यामुळे लक्ष्यवेध शीघ्र गतीने होत असे.

'बिस्मार्क'चे कर्णधार कॅप्टन लिंडेमान आणि ॲडमिरल लटयेन्स हे अत्यंत अनुभवी आणि कुशल अधिकारी होते. काही महिन्यापूर्वी या लटयेन्सच्या नेतृत्वाखाली स्कार्नहॉर्स्ट आणि नायसेनॉव या जर्मन नौकानी बावीस ब्रिटिश व्यापारी नौका रसातळाला पाठवल्या होत्या. या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली 'बिस्मार्क'च्या युद्धसज्जतेला एक वेगळाच दिमाख प्राप्त झाला होता. वीस मे एकोणिसशे एकेचाळीस रोजी ॲडमिरल लटयेन्स 'बिस्मार्क'सोबत प्रिन्स युजेन आणि इतर अकरा सरक्षक नौकाचा काफिल घेऊन नॉर्वेकडे निघाला. तेथून डेन्मार्क-सामुद्रधुनीच्या मार्गाने अटलांटिक महासागरात घुसून अन्नवाहू ब्रिटिश नौकाची वाटमारी करण्याचा आदेश लटयेन्सला मिळाला होता.

मे महिन्याच्या सुरुवातीला, कील बदरात नागरून पडलेली असताना, 'बिस्मार्क'ला हिटलरने भेट दिली होती. त्यावेळी "जर्मन नौदलाला तुमचा अभिमान वाटतो" असे गौरवोद्गार 'बिस्मार्क'च्या नाविकाना उद्देशून त्याने काढले होते.

तेवीस मे रोजी, सकाळी, वाटेत 'बट ऑफ लेविस'जवळ रिपल्सला समवेत घेऊन टोळीचा काफिला पश्चिम दिशेने चालू लागला. समुद्र खवळलेला होता आणि आकाश मेघव्याप्त होते.

टेहळणी करणाऱ्या विमानाकडून 'बिस्मार्क'ची काही बातमी कळण्याची वाट टोव्ही पाहात होते. परतु हवामान विपरीत होते. विमानोड्डाण अशक्यप्राय झाले होते. रात्र झाली. नकाशा पुढे घेऊन टोव्ही 'बिस्मार्क' कोठे असेल याची चिंता करत होते. नॉर्वेजियन फियोर्डमध्ये 'बिस्मार्क'ला हेरल्याला आता दीड दिवस उलटून गेला होता. नॉर्वेचा किनारा सोडून 'बिस्मार्क' एव्हाना शेकडो मैल दूर गेली असण्याचा सभव होता. पण कोणत्या दिशेला?—डेन्मार्क-सामुद्रधुनीच्या मार्गाने किंवा दुसऱ्या आईसलँड-फारोज मार्गाने 'बिस्मार्क' अटलांटिक महासागरात घुसेल हा आपला अदाज चुकीचा तर नसेल ना, अशी शका टोव्हींना आता येऊ लागली. कदाचित इतर पर्यायाकडे आपले पुरेसे लक्ष गेले नसावे: 'बिस्मार्क' कदाचित परत जर्मनीकडे फिरली असेल. कदाचित तिने पुन्हा त्या अकरा संरक्षक नौकाना गाठले असेल आणि फौजा वाहून त्या आइसलँड व फारोज बेटावर उतरवण्याचा तिचा इरादा असेल. किंवा...

परतु दर्यासारगाना एक सहावे इंद्रिय असते म्हणतात. अशा गोंधळ उडवणाऱ्या परिस्थितीत त्या इंद्रियाची साक्ष खरी मानली जाते. म्हणून टोव्हींनी आपला नियोजित मार्ग बदलला नाही. 'बिस्मार्क'बद्दलचा त्याचा अदाज चुकलेला नव्हता!

दरम्यान डेन्मार्क-सामुद्रधुनीमध्ये नाटकाला रंगत चढत होती. रिअर-अ‍ॅडमिरल वेकवॉकर याची नॉरफोक आणि कॅप्टन एलिस याची सफोक याचे गस्त घालण्याचे काम चालले होते. गेले कित्येक दिवस हे कटाळवाणे काम त्या दोन क्रूझर्स इमानेइतबारे करत होत्या.

डेन्मार्क-सामुद्रधुनीच्या आसपास महासागराचे रूप भयकर होते. गोठवणारी थंडी आणि प्रचड, घातक लाटा याचे माहेरघरच होते ते. एका बाजूला ग्रीनलँड आईस एजचे एखाद्या राक्षसाच्या सुळ्यासारखे आकाशात उच गेलेले शुभ्रधवल सुळके आणि बाजूला आईसलँडचे स्पष्ट दिसणारे विशाळ कडे: अशेष पृथ्वीवर इतकी एकाकी, विषण्ण करणारी जागा क्वचितच असेल.

तेवीस तारखेच्या दुपारी या भागातील वातावरण चमत्कारिकच होते. ग्रीनलँड आईस एजजवळ सारे निरभ्र होते तर आईसलँडची बाजू गहन धुक्यात सपूर्ण वेढली गेली होती. दोन बाजूना असा विलक्षण निसर्ग घेऊन सफोक आणि नॉरफोक कसोशीने गस्त घालत होत्या.

'बिस्मार्क'च्या अटलांटिक-प्रवेशाला मोठे अनुकूल वातावरण होते ते!

दोन्ही क्रूझर्सवरील नाविकाना 'बिस्मार्क'ने नॉर्वेजियन फियोर्डचा आश्रय सोडल्याचे वर्तमान कळले होते, आणि बहुधा डेन्मार्क-सामुद्रधुनीच्या मार्गाने अटलांटिक महासागरात घुसण्याचा प्रयत्न 'बिस्मार्क' करील, हा वरिष्ठाचा अदाजही त्यांना माहीत होता. त्यामुळे सफोक-नॉरफोकवरील नाविकाना चमत्कारिक हुरहूर लागून राहिली होती. वातावरण तग झाले होते. शिवाय विचित्र

हवामानामुळे विमानाने टेहळणी करण्याचा प्रयत्न अशक्य झ ला होता. त्यामुळे या क्रूझर्स दुप्पट सावध राहिल्या होत्या.

सामुद्रधुनीच्या धुक्याने वेढलेल्या सीमेच्या निकट राहून सफोक-नॉरफोकची टेहळणी चालली होती. यामुळे 'बिस्मार्क 'ची चाहूल लागताच त्यांना धुक्याच्या सरक्षक कवचाआड जाणे शक्य होणार होते. या दोन लहान क्रूझर्सनी 'बिस्मार्क 'शी समोरासमोर चार हात करणे आततायीपणाचे आहे, हे वेकवॉकर जाणत होता. 'बिस्मार्क 'ने त्याचा तेव्हाच चक्काचूर केला असता. सफोक-नॉरफोककडून लढतीची अपेक्षाच नव्हती. 'बिस्मार्क 'वर पाळत ठेवण्याची कामगिरी त्याच्यावर होती. त्यासाठी धुक्याच्या पडद्याचा मोठाच उपयोग होणार होता.

दुपार टळून गेली होती. वेळ जाता जात नव्हता. सफोकच्या कॅप्टन एलिसने टेहळ्यांना विशेष दक्ष राहण्याचा हुकूम दिला होता. सात वाजून वीस मिनिटे झाली होती. अचानक, दूरवर, धुक्याचा भेद करत पुढे सरकणारे एका युद्धनौकेचे महाकाय धूड टेहळ्याला दिसले. 'बिस्मार्क 'चा शोध लागला होता: ती आपण होऊनच सामोरी येत होती! थोड्या वेळाने तिच्या मागून उजव्या बाजूने येणारी प्रिन्स युजेनदेखील दृष्टीला पडली. आठ मैलांवरून या दोन नौका संथ गतीने जवळ येत होत्या.

कॅप्टन एलिसने सफोक तत्काळ धुक्याच्या पडद्याआड नेली. कारण तितक्या अतरावरूनदेखील 'बिस्मार्क 'च्या तोफानी तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवल्या असत्या. सुदैवाने सफोक शत्रूच्या दृष्टीला पडली नव्हती. रडारच्या साहाय्याने 'बिस्मार्क 'वर नजर ठेऊन कॅप्टन एलिस तिच्या हालचालीची तपशीलवार माहिती बिनतारी तारायंत्राने टोव्हींना कळवू लागला. दोन्ही नौकांना त्याने आपल्या अगा-वरून पुढे जाऊ दिले, आणि मग त्याचा पाठलाग आरंभला.

सफोकच्या दक्षिणेला पंधरा मैलावर असलेल्या नॉरफोकवरदेखील सारे सावध झाले होते. 'बिस्मार्क ' दिसल्याचा इशारा सफोककडून मिळाला होता. कित्येक दिवसाच्या कटाळवाण्या टेहळणीनतर सावज अचानक दृष्टीला पडले होते. त्याचा पाठपुरावा करणे अत्यावश्यक होते. दाट धुक्यातून वेकवॉकरने नॉरफोक सरळ पुढे काढली; आणि 'बिस्मार्क ' निश्चित कोठे आहे याचा कानोसा घेण्यासाठी एका तासाने धुक्याचा पडदा बाजूला सारून त्यानी नॉरफोक बाहेर काढली तेव्हा अवघ्या पाच मैलावरून 'बिस्मार्क ' नॉरफोकच्याच रोखाने वेगात येत होती.

नॉरफोक दृष्टीला पडताच 'बिस्मार्क 'च्या पंधरा इची तोफांनी तत्काळ भडिमार केला. तोफमाऱ्यामुळे नॉरफोकच्या दोन्ही बाजूंना पाण्याचे डोंगर उसळले. डेकवर धगधगीत धातूच्या तुकड्यांची पखरण झाली. नॉरफोकने त्वरेने पुन्हा धुक्याचा आश्रय घेतला. दैव बलवत्तर म्हणूनच नॉरफोक या जीवावरच्या सकटा-तून सहीसलामत सुटली.

आता शत्रूची वार्ता कळवण्याची नॉरफ़ोकची पाळी होती. आश्चर्य असे की नॉरफोकने कळवण्यापूर्वी नौदलाच्या मध्यवती कार्यालयाला वा टोव्हीना 'बिस्मार्क' बद्दल काहीच वार्ता कळली नव्हती. कारण बिनतारी तारायंत्रव्यवस्थेतील काही अज्ञात उणीवेमुळे सफोकने आधी धाडलेल्या वार्ता आणि सविस्तर संदेश टोव्हीं-पर्यंत पोचलेच नव्हते !

नॉरफोकची नियोजित कामगिरी सफोकपेक्षा थोडी वेगळी होती. नॉरफोकवर अद्ययावत रडार-व्यवस्था नव्हती. म्हणून शक्यतो धुक्याचा आश्रय घेऊन आणि सुदैवावर हवाला ठेऊन तिला 'बिस्मार्क'वर नजर ठेवावी लागत होती. पुन्हा 'बिस्मार्क' दृष्टिआड जाऊ देणे इष्ट नव्हते. परतु त्याकरता 'बिस्मार्क'जवळ जाण्यात तिच्या तोफाचा बळी होण्याचा धोका होता. धुके विरल्यानंतर नॉरफोकने जगण्याची आशा करणे वेडेपणाचे होते. तरीही दैवावर आणि नौदलाच्या धाडसी परपरेवर विसबून नॉरफोक आपले कर्तव्य बजावत होती.

सफोकने बिनतारी तारायत्राने पाठवलेल्या सदेशमालिकेपैकी एक हूड या लढाऊ क्रूझरने उचलला. त्यावेळी आठ वाजून गेले होते. सदेशातील माहितीप्रमाणे 'बिस्मार्क' हूडच्या उत्तरेला तीनशे मैलावर होती. हूडच्या कप्तानाने – ॲडमिरल हॉलंडने – 'बिस्मार्क'ला मध्येच गाठण्यासाठी हूड वायव्येला वेगाने चालवली. सर जॉन टोव्हीना 'बिस्मार्क'ची वार्ता समजली तेव्हा ती त्याच्यापासून सहाशे मैलावर होती. त्यानीही शत्रूला गाठण्यासाठी आपला काफिला कमाल वेगाने चालवला.

'बिस्मार्क'ची अटलांटिक महासागराकडची धाव मध्येच थोपवणे आवश्यक होते. कित्येक नौका आणि असख्य माणसाचे प्राण धोक्यात होते.

सफोक-नॉरफोकना आपल्यावरील जबाबदारीची पूर्ण कल्पना होती. 'बिस्मार्क'चा पिच्छा पुरवून तिला लवकरच युद्धात खेचणे जरूरीचे होते. कारण डेन्मार्क-सामुद्रधुनीमधून खुल्या अटलांटिक महासागरात आल्यावर, युद्ध टाळून, ब्रिटिश शिकारी नौकाना हुलकावणी देऊन, आपली कामगिरी पार पाडण्यासाठी निसटून जाण्याचा प्रयत्न 'बिस्मार्क' करू शकली असती.

सफोक-नॉरफोकवरील नाविकांच्या कसोटीची वेळ होती ती. त्यातच पाऊस आणि बर्फ पडायला सुरुवात झाली. त्या विलक्षण वातावरणात 'बिस्मार्क'वर पाळत ठेवणे टेहळयांना फार जड जात होते. त्याना चमत्कारिक भास होऊ लागले. 'बिस्मार्क' मोहरा फिरवून अकस्मात जवळ आली आहे असे त्याना कितीतरी वेळा वाटले. कधी कधी, कितीतरी वेळ खुद्द 'बिस्मार्क' दिसेनाशी होई; फक्त सफोकच्या रडारवर तिच्या अस्तित्वाची खूण उमटत राही.

अकस्मात वळून 'बिस्मार्क' कधी मारा करील ते सागता येत नव्हते. त्यामुळे फार सावध राहावे लागत होते....आणि खरोखरच 'बिस्मार्क'ने एकदम मोहरा बदलला. ती सरळ सफोकवर चाल करून आली. कॅप्टन एलिसने तत्परतेने सफोकचे तोंड फिरवले आणि पळ काढला. काही मिनिटे गेली. सफोकवरील नाविक

' बिस्मार्क 'च्या तोफमाऱ्याची अपेक्षा करत होते. पण काहीच झाले नाही. सारे कसे शांत शात होते ' बिस्मार्क 'ने मोहोरा फिरवल्याचा भास सफोकला झाला होता !

त्यामुळे सफोक ' बिस्मार्क 'पासून कित्येक मैल दूर गेली होती. तिच्या रडारवर ' बिस्मार्क 'चे अस्तित्व आता टिपले जात नव्हते. सफोकने पुन्हा पूर्वीचा मार्ग धरला आणि वेग वाढवून गमावलेले अतर भरून काढले काही वेळ ने शत्रूचा माग पुन्हा लागला.

इकडे हूड आणि प्रिन्स ऑफ वेल्स वेगाने ' बिस्मार्क 'ला गाठण्याचा प्रयत्न करत होत्या. त्या वेगामुळे त्याच्या बरोबरच्या सहा विनाशिकाची तार वळ उडाली होती. चोवीस मेची पहाट उजाडायला अजून थोडा अवकाश होता. हॉलडने युद्धाची योजना आखायला सुरुवात केली. सारेजण सिद्ध झाले. गोलंदाजानी मोर्चे बाधले. विमानवेधी तोफा सज्ज झाल्या. शुश्रुषा-पथकाने आवश्यक ती तयारी केली

पहाटेचे चार वाजले तेव्हा ' बिस्मार्क ' हूडपासून अवघी वीस मैलावर होती. दिशा हळूहळू उजळत होत्या. चार वाजून तीस मिनिटे झाली, आता हूड आणि ' बिस्मार्क ' याच्यातील अंतर आणखी कमी झाले. तरी अजून दोघीनी दृष्टिभेट होत नव्हती. पाच वाजून पस्तीस मिनिटे झाली, आणि ' बिस्मार्क ' व प्रिन्स युजेन स्पष्ट दिसल्याचा पुकारा हूडवरील टेहळ्याने केला. तोफाची तोडे ' बिस्मार्क 'वर रोखली गेली. हूड वेगाने पुढे सरसावली.

हॉलंडने मारा करताना हूडला अग्रभागी ठेवले होते. कोऱ्या करकरीत प्रिन्स ऑफ वेल्सपेक्षा जुनाट हूडची निवड त्याने का केली ते कळणे कठीण होते. दूर कोठेतरी सफोक आणि नॉरफोक दिसत होत्या. आपले पाळत ठेवण्याचे काम त्यानी मोठ्या हिकमतीने बजावले होते. आपले सदेश ॲडमिरल हॉलडच्या या सग्राम-दलाला (battle squadron) मिळाले हे पाहून सफोक-नॉरफोकना कर्तव्यपूर्तीचे समाधान वाटत होते. प्रत्यक्ष युद्धात भाग घेण्याचा आदेश हॉलडने त्याना का दिला नाही याचा मात्र उलगडा होत नाही. हूड व प्रिन्स ऑफ वेल्स याच्याशी अटीतटीचा मकाबला करणाऱ्या जर्मन नौकावर सफोक–नॉरफोक दुसऱ्या बाजूने हल्ला चढवू शकल्या असत्या. परंतु हुकुमाप्रमाणे त्यांना नुसती तटस्थ प्रेक्षकाची भूमिका करावी लागली.

पाच वाजून एकूण पन्नास मिनिटे झाले. हॉलडने प्रिन्स ऑफ वेल्सला हुकूम पाठवला : डाव्या बाजूच्या नौकेवर लक्ष केंद्रित करा. हुकूम कळताच प्रिन्स ऑफ वेल्सला आश्चर्याचा धक्का बसला. कारण डाव्या बाजूची नौका प्रिन्स युजेन होती ! पाच-बावन्नला हॉलडच्या हुकुमात अपेक्षित सुधारणा झाली.

हूडवरील तोफा अकस्मात धडाडल्या. पहाटेच्या शाततेला शतधा तडे गेले. काही क्षणातच प्रिन्स ऑफ वेल्सच्या तोफा आग ओकू लागल्या. ' बिस्मार्क ' आणि प्रिन्स युजेनने तत्परतेने प्रत्युत्तर दिले. डोगराएवढ्या लाटा उसळल्या.

अल्पावधीतच प्रिन्स युजेनवरून एक तोफगोळा हूडवर अचूक येऊन आदळला.

हूडच्या मध्यभागी आग लागली, आणि ती पसरत चालली. मोठ्या कष्टाने ती कशीतरी विझवण्यात आली.

हॉलंडची नौका मोठ्या चमत्कारिक परिस्थितीत सापडली होती. शत्रूला गाठण्याच्या प्रयत्नात हूड उतावळेपणाने ' बिस्मार्क 'च्या नको तितकी जवळ गेली होती. पण अशा पद्धतीने जवळ गेल्यामुळे तिला आपल्या सगळ्या तोफा ' बिस्मार्क 'वर रोखता येत नव्हत्या. हूडचे दोन्ही टोकावरचे चिलखत भक्कम होते हे खरे; परंतु तिच्या दोन्ही बाजू मात्र कमकुवत होत्या. आणि ' बिस्मार्क ' व प्रिन्स युजेन यांच्या लांब पल्ल्याच्या तोफांनी या बाजूवर आता संयुक्तपणे निकराचा हल्ला चढवला होता.

हूडवर धडाधड तोफगोळे कोसळले. त्यांचे प्रचंड स्फोट होऊ लागले. ' बिस्मार्क 'च्या तोफेचा एक गोळा हूडच्या तीनशे टन दारूगोळा असलेल्या कोठारात जाऊन धडकला...आणि हूड छिन्नविच्छिन्न झाली. काही क्षण तिचे अवशेष तरंगताना प्रिन्स ऑफ वेल्सला दिसले, आणि मग तेही पाण्यात गडप झाले. हूडवरील पंचाण्णव अधिकारी आणि एक हजार तीनशेचोवीस नाविकांपैकी अवघी तीन माणसे वाचली. आरमारी युद्धाच्या इतिहासात सर्वनाशाचे असे उदाहरण क्वचितच सापडेल.

हूड ही ब्रिटिश नौदलातील एक बलाढ्य नौका होती. अवघ्या तीन मिनिटात तिची अशी केविलवाणी दुर्दशा झालेली पाहून प्रिन्स ऑफ वेल्सच्या नाविकांची गाळण उडाली. पण आता युद्धातून पाय काढणे शक्य नव्हते. हूडचा निकाल लावल्यावर दोन्ही जर्मन नौकांचा मारा एकट्या प्रिन्स ऑफ वेल्सवर केंद्रित झाला.

खरे म्हणजे प्रिन्स ऑफ वेल्सचीदेखील हूडसारखीच गत व्हायची. पण आश्चर्य असे की तिच्यावर कोसळलेल्या काही तोफगोळ्यांचा मुळी स्फोटच झाला नाही. अर्थात स्फोट झालेल्या गोळ्यांनी तिलाही जखमा झाल्याच. काही वेळा तर यंत्र-सामग्रीत बिघाड होऊन प्रिन्स ऑफ वेल्सच्या तोफा निकामी झाल्या. पण ब्रिटिश यंत्रज्ञांनी हिंमत सोडली नाही. युद्धाच्या धुमश्चक्रीतही आपले काम चोख बजावून त्यांनी बहुतेक तोफा कार्यक्षम केल्या. प्रिन्स ऑफ वेल्सवरील एक मोठी तोफ युद्धाच्या आरंभीच बंद पडली होती ती मात्र दुरुस्त झालीच नाही. किंबहुना प्रिन्स ऑफ वेल्सला ' बिस्मार्क 'शी आपल्या सर्व शक्तीनिशी सामना देणे शक्य झाले नाही. आणि तरीही तिच्या कामगिरीमुळे युद्धाचे पारडे ब्रिटिशांच्या बाजूला झुकले होते! मात्र खुद्द प्रिन्स ऑफ वेल्सला याची यत्किंचित कल्पना नव्हती.

या नवख्या नौकेने खरोखरच त्या महाकाय जर्मन युद्धनौकेला अवघड जागी दोन जखमा केल्या होत्या. त्यामुळे ' बिस्मार्क 'च्या उघडलेल्या काळदाढेत शिर-णाऱ्या अन्नवाहू नौकांच्या काफिल्यांना भीती उरली नाही. दोहोंपैकी एक जखम मुळी ' बिस्मार्क 'च्या तेलाच्या टाकीलाच पडली होती. त्यामुळे अन्नवाहू नौकांकडे वळवलेला आपला मोहरा ॲडमिरल लटयेन्सला बदलावा लागला. सेंट नाझेर या फ्रेंच बंदराकडे ' बिस्मार्क ' वळवण्याचा निर्णय त्याने घेतला. त्याशिवाय ' बिस्मार्क 'ची

गतीदेखील मंदावली होती. परिणामतः किंग जॉर्ज द फिफ्थ, रिपल्स आणि व्हिक्टोरियस याना घेऊन येणाऱ्या दर्यासारंग टोव्हीना 'बिस्मार्क'ला गाठणे अधिक सुलभ झाले होते.

शाबास प्रिन्स ऑफ वेल्स !

रिअर-ॲडमिरल वेकवॉकरने नॉरफोक युद्धक्षेत्रापासून बाजूला घेतल्याबरोबर हूडच्या शोकातिकेची दु.खद वार्ता नौदलप्रमुखांना कळवली. गेल्या वर्षभरात नौदल-प्रमुखांना ऐकाव्या लागलेल्या अशुभ वार्तामालिकेतील ही सर्वात अशुभ वार्ता होती.

आरमारवेड्या ब्रिटिशाचा हूड हा अभिमानविषय होता व्हाईस ॲडमिरल हॉलंड आणि कॅप्टन केर या तिच्यावरील अधिकाऱ्याचा लौकिक मोठा होता. त्यामुळेच ज्यावेळी वेकवॉकरने मोठ्या कौशल्याने 'बिस्मार्क' हूडच्या टप्प्यात आणली त्या वेळी हूड तिचा बंदोवस्त नक्की करील असा अर्धवट विश्वास नौदलाला वाटत होता. पण झाले होते भलतेच. ब्रिटनच्या दाराशी घोटाळणाऱ्या या लाडग्याने हूडलाच गिळंकृत केले. प्रिन्स ऑफ वेल्सची दैना केली आणि उत्तर अटलांटिकमध्ये असलेल्या सावजावर बेगुमानपणे चाल केली.

एकूण 'अजिक्य' म्हणून झालेली 'बिस्मार्क'ची कीर्ती अतिशयोक्त नसून सत्यस्वरूपच असावी, अशी भीती नौदलप्रमुखाना वाटू लागली. तिचा पाडाव करणे ही गोष्ट सोपी नाही, हे त्याना कळून चुकले. 'बिस्मार्क'चो धाव थाववायची असेल तर तिला गाठू शकणाऱ्या प्रत्येक लढाऊ नौकेला तिच्यावर चाल करून जाण्याचा आदेश देणे आवश्यक आहे असे नौदलप्रमुखाना वाटू लागले हूडचा बदला घेण्याची इच्छा प्रबळ झाली तिला साजेशा निर्धाराने पुढ ल डावपेचाना सुरुवात झाली.

इतक्यात खुद्द पंतप्रधान विन्स्टन चर्चिल नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयात आले. हूडच्या अताची दुर्वार्ता त्याना नुकतीच समजली होती. लोकाच्या आधीच खचलेल्या मनोधैर्यावर या वार्तेचा काय परिणाम होईल, याची कल्पना अर्थातच चर्चिलना होती. तरीहो त्यानी स्वत धीर सोडला नव्हता युद्धाची परिस्थिती त्यांनी तत्पर-तेने समजावून घेतली, नकाशे पाहिले, डावपेचाची माहिती करून घेतली आणि नतर त्याच्या मुखाने जणु ब्रिटिश राष्ट्राच्या मनोगतालाच शब्दरूप मिळाले. ते म्हणाले, "'बिस्मार्क'ला जलसमाधी द्या. तुम्ही ते कसे करता याची मला फारशी पर्वा नाही पण तिला जलसमाधी मिळालीच पाहिजे !"

विद्युत्प्रेरणा मिळाल्यासारखे नौदल कार्यालय गतिमान झाले. या ऐतिहासिक मोहिमेतील सर्वात धाडसी निर्णय त्वरेने घेण्यात आला. त्या अन्वये अन्नवाहू नौकाची पाठराखण करणाऱ्या लढाऊ नौकांनादेखील, आपली नियोजित कामगिरी सोडून 'बिस्मार्क'वर चाल करण्याचा आदेश देण्यात आला. ब्रिटिश नौदलाचे जाळे 'बिस्मार्क'भोवती हळूहळू पण चिवटपणे गोळा होऊ लागले.

जिब्राल्टरहून लडनला निघालेल्या अन्नवाहू नौकाना सरक्षण देणाऱ्या लडन या क्रूझरला, त्या नौका एकाकी सोडून, आपला नियोजित मार्ग बदलून, नॉरफोक

आणि सफोकप्रमाणे 'बिस्मार्क'चा पाठपुरावा करण्याचा आदेश देण्यात आला. अॅझोरेसजवळ असलेल्या एडिंबर्ग या क्रूझरला, डेन्मार्क-सामुद्रधुनीमध्ये 'बिस्मार्क' अवतीर्ण झाल्याचा संदेश मिळाला होता; आणि 'बिस्मार्क'ला गाठणे आपल्याला शक्य आहे हे लक्षात येताच वरिष्ठाच्या आदेशाची वाट न पाहता एडिंबर्गचा कर्णधार कमोडोर ब्लॅकमन याने क्रूझर 'बिस्मार्क'च्या दिशेने वळवली होती. हूडच्या सर्वनाशानंतर वरिष्ठाचा 'बिस्मार्क'ला वेधण्याचा आदेश ब्लॅकमनला, तो 'बिस्मार्क'च्या वाटेवर असतानाच मिळाला. वास्तविक एडिंबर्गचा तेलसाठा संपत आला होता. तशा स्थितीत 'बिस्मार्क' आणि प्रिन्स युजेन यांना सामोरे जाण्यात फार मोठा धोका होता. पण नौदलप्रमुखांच्या 'तेलसाठ्याचा विचार सोडून द्या' या आदेशाचा अवमान करणे उचित झाले नसते. वायव्येला, जवळजवळ अटलांटिक महासागराच्या मध्यभागी असलेल्या रामिलिज या जुनाट युद्धनौकेलादेखील, बरोबर असलेल्या अन्नवाहू नौका वाऱ्यावर सोडून, पश्चिमेकडून शत्रूवर घसरण्याचा आदेश देण्यात आला. रामिलिजचा वेग अति मंद होता. त्यामुळे 'बिस्मार्क' पुढे उभे राहणे तिला शक्यच नव्हते. पण धोक्याचे भेदरट विचार सोडून देऊन रामिलिज 'बिस्मार्क'ला गाठण्यासाठी निघाली. या मोहिमेचे जाळे टाकण्याच्या प्रयत्नात नौदलाचे हात कॅनडापर्यंत पोहोचले. हजारो मैलांवर नोव्हा स्कॉटिया येथे असलेल्या रिव्हेंज या युद्धनौकेला रामिलिजने सोडलेल्या अन्नवाहू नौकांचा तावा घेण्यास फर्मावण्यात आले. आयर्लंडच्या किनाऱ्यापासून पाचशे मैलावर, अमेरिकेला जाणाऱ्या ब्रिटानिक या उतारूवाहू नौकेचा सांभाळ करणाऱ्या रॉडने या म्हाताऱ्या युद्धनौकेलाही पाचारण करण्यात आले. खरे म्हणजे रॉडनेने ब्रिटानिकचे संरक्षण करण्यापेक्षा ब्रिटानिकनेच रॉडनेचे संरक्षण करणे न्यायाचे ठरले असते, अशी रॉडनेची स्थिती होती. अमेरिकेला, बॉस्टन येथे तिची दुरुस्ती होणार होती. डेकवर दुरुस्तीचे सामान रचलेले होते. परंतु 'बिस्मार्क'ला लढाईत गाठण्याची शक्यता दिसताच रॉडनेचा कर्णधार डालरिंपल-हॅमिल्टन याने कसलीही क्षिती न बाळगता वेगाने 'बिस्मार्क'कडे धाव घेतली. जिब्राल्टरजवळ व्हाईस अॅडमिरल सर जेम्स सॉमरव्हिल यांच्या आधिपत्याखाली नौदलाचा एच् विभाग सज्ज होता. भूमध्यसमुद्रातून पश्चिमेला घुसू पाहणाऱ्या इटालियन लढाऊ नौकांचा बंदोबस्त करण्याची कामगिरी या विभागाकडे होती. लढाऊ क्रूझर रिनाऊन, विमानवाहू नौका आर्क रॉयल, क्रूझर शेफिल्ड आणि सहा विनाशिका यांनी सिद्ध झालेल्या या विभागाला, हूडचा पाडाव झाल्यावर, आपली नियोजित कामगिरी सोडून सरळ 'बिस्मार्क' कडे मोहोरा वळवण्याचा आदेश देण्यात आला. नौदलाच्या नंतरच्या निवेदनाप्रमाणे, हूडच्या मृत्युदिनीच, 'बिस्मार्क'चे भवितव्य हाती घेऊन सॉमरव्हिलनी एच् विभागाचे जिब्राल्टरजवळचे ठाणे उठवले.

(क्रमशः)



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे


## ◻ केर काढण्याचे अॅडव्हान्स ट्रेनिंग

कुठल्याही गोष्टीचे उच्च शिक्षण हवे असेल तर हिंदुस्थानातल्या माणसाला 'फॉरीन'ला जाण्याखेरीज गत्यंतर नसते. पण फॉरीनच्या माणसांनाही अशाच उच्च शिक्षणासाठी आणखी फॉरीनला जावे लागत असेल हे अस्मादिकांना माहीत नव्हते. पण परवाच वर्तमानपत्रात वाचले की इंग्लंडमधील चार झाडूवाल्यांना परदेशातल्या स्वच्छता-व्यवस्थेचे अध्ययन व निरीक्षण करण्यासाठी खास शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. म्हणजे आता आहे की नाही बोला ! झाडून सगळ्या देशात झाडून काढण्याच्या शास्त्राचा विकास झाला असला तर केरसुणी करण्याची कला काही सारखीच विकास पावलेली नसणार. म्हणूनच इंग्लंडमधल्या झाडूवाल्यांनाही केर काढण्याचे अॅडव्हान्स ट्रेनिंग घेण्यासाठी परदेशी प्रयाण करण्याची पाळी आलेली दिसते. आता ही मंडळी कुठकुठल्या देशात जाणार हे अजून नक्की झालेले नाही. पण त्यांनी हिंदुस्थानात अवश्य यावे. निदान केर कसा काढू नये याचे नगरपालकीय शिक्षण हिंदुस्थानातल्या प्रमाणे इतर कोठेच मिळू शकणार नाही. कुठल्याही उलटीपालटीला विचारा !

## ◻ शांततेचा रिडक्शन सेल

जगात चिरकाल शांतता नांदावी याबद्दल कुणाचेच दुमत नाही. फक्त ती कशी नांदेल एवढाच मतभेदाचा प्रश्न आहे. इराणमध्ये जाहिरातबाजीचा व्यवसाय करणाऱ्या एका इसमाने म्हणे निक्सन साहेबांना असे पटविण्याची खटपट चालविली आहे की, टिकाऊ शांतता प्रस्थापित करण्याचा एकच रामबाण उपाय आहे, व तो म्हणजे शांततेची चिकार जाहिरात करणे. आता शांतता ही चीज बरीच जुनी-पुराणी असली तरी ती प्रस्थापित करण्याचा हा मार्ग मात्र एकदम मॉडर्न आहे यात शंका नाही. पूर्वीच्या जगात परमेश्वर सर्वव्यापी होता त्याप्रमाणे आधुनिक जगात जाहिरात सर्वव्यापी आहे. तेव्हा शांततेचा खप वाढवायचा असेल तर तिची भरपूर जाहिरात करण्याखेरीज खरोखरीच दुसरा उपाय नाही. त्यातून चीज जेवढी तकलादू तेवढी तिला जाहिरातीची अधिक आवश्यकता असते. म्हणजे शांततेचा खप जाहिरातीशिवाय अन् रिडक्शन सेल लावल्याशिवाय होणे अशक्य हे ओघानेच आले.

◻ ◻ ◻



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

४ ते १० एप्रिल १९७०

**मेष :** या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला सुखदायक आहे. पहिले बुध-मंगळ-शनी-शुक्र, बारावा रवी अकरावा राहू व सातवा गुरु असे रवीखेरीज सर्व ग्रह शुभस्थानातून शुभफलदायी आहेत. विद्याभ्यासात अपयश. संततीकडून त्रास. सरकारी कामात माघार. लग्नातील चार ग्रहात नैसर्गिक बलात शुक्र सर्वात प्रबळ आहे. तो धनेश व सप्तमेश आहे. भागीदारीत भरपूर फायदा होईल. चंद्राचे भ्रमण १२।१।२ या घरातून आहे ते चांगले आहे. ता. ५।६ सरकारी अगर सार्वजनिक काम करू नये. ता. ७।८ ला घराची कामे करावी. सहकारी कामाची सुरुवात करावी. ता. ९।१० ला भरघोस धनलाभ होईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ७।८।९।१० पुष्कळ ग्रह एकत्र आले तर असा अनुभव आहे की ते काहीच फळ देत नाहीत. Many a cook spoil the broth किंवा "बारा जणांची खेती आणि धूळ लागे हाती ' असे होते.

**वृषभ :** या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला सर्व बाबतीत कष्टदायक आहे. बुध-मंगळ-शनी शुक्र बारावे. अकरावा रवी, दहावा राहू व सहावा गुरु. राहू-रवीखेरीज सर्वग्रहांना योगबळ आहे, पण स्थानबल नाही. ४ ग्रह व्ययात पडले आहेत व गुरु सहावा आहे., चतुर्थस्थानाखेरीज सर्व केंद्र-त्रिकोणांचे अधिपती व्ययात आहेत. धननाश, विद्येत अपयश, व्यापारधंद्यात अतोनात नुकसान. मानहानी. भागीदारांशी भांडण. आतड्याच्या विकाराने आजारी पडण्याचा योग. चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे. ४।५।६ तारखा सरकारी कामाला चांगल्या आहेत. ता. ७।८ ला कोणतेही काम होणार नाही. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे व, ब, न, य, उ, आ, ओ, ई या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ४।५।६।९।१०.

**मिथुन :** ह्या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला सुखकारक आहे. बुध-शुक्र-शनी-मंगळ अकरावे रवी दहावा, राहू नववा व गुरु पाचवा असे सर्वच ग्रह सेवेला तयार. मिथुनेचे राजयोगकारक ग्रह बुध-शुक्र-शनी व राहू सर्वभाग्य व एकादश-स्थानात आहेत. ता. ७।८ अचानक भरघोस धनलाभ मित्रांकडून सर्वतोपरी मदत. सट्टे लॉटरीत लाभ होण्याचा चांगला योग. ४२ वर्षाचे पुढे वय असलेल्याना हे फल निश्चित मिळणार. विद्याभ्यासात भरघोस यश, सार्वजनिक कामात मानमान्यता.

चद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे ते चागले आहे. ९।१० ता खाना नाटकाशी सबंध असलेल्या व्यक्तीना त्यात यश प्राप्त होईल. ज्या व्यक्तीची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, भ, घ, छ या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरील-प्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा ५।६।७।८.

**कर्क** : या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला नाशकारक आहे. दहावे बुध-शुक्र-शनी-मंगळ, नववा रवी, आठवा राहू व चौथा शनी असे रवीखेरीज सर्व ग्रह अशुभ फलदायक आहे. दशमातील चतुग्रही धद्याचा बोजवारा उडवील. मानहानी होईल. प्रत्येक बाबतीत अपयश येईल. याचा अनुभव ७।८ तारखाना जास्त येईल. चद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ते त्यातल्यात्यात बरे आहे. ५।६ तारखाना सरकारी काम थोडे बरे होईल. ता. ४ ला अत्यंत मानसिक यातना व धननाश होईल. राग अनावर होईल. वाचाशुद्धी नष्ट होईल. प्रत्येक शब्द खोटा पडेल. एकच, चतुर्थातील गुरु प्रत्येक वेळी परिस्थिती सावरील. ज, स, ख, ह, ड या अक्षरानी ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे सुरू असतील त्यानाही वरील प्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ४।५।६.

**सिंह** : या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला प्राप्तीकारक आहे. नववे बुध-शुक्र-शनी-मगळ, आठवा रवी, सातवा राहू व तिसरा गुरू असे सर्व ग्रह शुभफल देणारे आहेत. भाग्यातील चतुग्रही व सप्तमातील राहू अचानक धनलाभ मिळवून देतील. चद्राचे भ्रमण ७।८।९।१० घरातून आहे ते चागले आहे. ता. ४ ला जरा मानसिक त्रास होईल. ता. ५।६ ला सरकारी कामात थोडा त्रास होईल. ता. ७।८।९।१० या दिवशी प्रत्येक कामात यश येईल. मानमान्यता मिळण्याचा योग आहे. रवी अष्टमात आहे तो वाईट नाही. रवी-चद्रांना ६।८।१२ घरांचा दोष नसतो. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे ग. श, म, ट आणि ठ या अक्षरानी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ७।८।९।१०

**कन्या** : या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला त्रासदायक आहे. बुध-शुक्र-शनी-मगळ अष्टमात, रवी सप्तमात, राहू षष्ठात व गुरू धनस्थानात. असे गुरू-शिवाय सर्व ग्रह अशुभफलदायी आहेत. विद्याभ्यासात अपयश, सततीकडून त्रास, मानहानी. आत्मघातकी विचार प्रबळ होऊन हातून अनेक चुका होतील. कन्या राशीचे सर्व राजयोगकारक ग्रह मृत्युस्थानात आहेत. चंद्राचे भ्रमण ७।८।९ स्थाना-तून आहे. ता. ५।६ काहीशा बऱ्या जातील. सार्वजनिक कामात यश येईल. ७।८ तारखांना अनेक तऱ्हेच्या अडचणी एकदम निर्माण होतील. त्यात अब्रू जाण्याची वेळ येईल. ७।८ तारखांना मित्राशी व वडील भावडाशी भांडणे होतील. त्यात अपयश येईल. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, घ, भ, छ या अक्षरांनी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा ५।६.

**तूळ** : या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला पीडादायक आहे. बुध-शनी-शुक्र-

मंगळ मारक स्थानात, रवी सहावा, राहू पाचवा व गुरू पहिला. सर्व ग्रह गुरू-शिवाय अशुभ स्थानात आहेत. विद्येत अपयश. संततीपासून त्रास. सरकारी कामात अपयश. चंद्राचे भ्रमण ६।७।८ या घरातून आहे ते तितकेसे चांगले नाही. ता. ५।६ त्यातल्यात्यात बरे दिवस आहेत. ७।८ तारखांना सर्व अनंत अडचणी निर्माण होतील. भागीदारांशी मतभेद. घरात पत्नीबरोबर भांडण. धननाश. अब्रूला धक्का बसण्यासारखी स्थिती निर्माण होईल. हट्टीपणा कमालीचा वाढेल. दररोज २८ वेळा खालील जप जपावा. सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके। शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।। १ ।। ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा ५।६.

**वृश्चिक** : या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला सौख्यकारक आहे. बुध-शुक्र-शनी-मंगळ सहाव्या स्थानात. पाचवा रवी, चवथा राहू व बारावा गुरू असे गुरूशिवाय सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. संततीकरता खर्च होईल. विद्याभ्यासात थोडा कमीपणा येईल. हातून पराक्रम होईल. शत्रूचा नाश होईल. अचानक धनलाभ होईल. मामा अगर सासऱ्याकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ या घरातून आहे, ते चांगले आहे. ७।८ तारखांना अचानक धनलाभ होईल. वाममार्गाने धनलाभ होईल. ९।१० तारखांना भागीदारांकडून सर्वतोपरी मदत होईल. सरकारी कामात भरघोस यश येईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे न, य, व, ब, आ, ड, ओ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा ७।८।९।१०.

**धन** : सप्ताहातील ग्रहमान धनराशीला सौख्यदायक आहे. पाचवे बुध-शुक्र-शनी-मंगळ, चवथा रवी, तिसरा राहू व अकरावा गुरु असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. विद्येत यश. मित्रांकडून धनलाभ. अचानक प्रवासाचा योग येईल व त्यात फायदा होईल. चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे. विवाह जमण्याला उत्तम योग आहे. विशेषत: ७।८ तारखांना हा योग जास्त चांगला आहे. ता. ५।६ घरात काहीतरी शुभ समारंभ होईल. अगर एकाद्या समारंभात भाग घेण्याचा योग येईल. वयाच्या २७ ते ३२ मध्ये असणाऱ्या तरुण–तरुणींना प्रेमविवाह जमण्याचे योग आहेत. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, भ, घ, छ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सर्व सप्ताहच शुभ आहे.



**मकर :** या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला मनस्वास्थ्य बिघडवणारे आहे. बुध-शुक्र-शनी-मगळ चवथे, तिसरा रवी, दुसरा राहू व दहावा गरु असे सर्व ग्रह शुभाशुभ स्थानात आहेत. धननाश होईल. सरकारी कामात नोकरीत यश मिळेल. मानसिक यातना फार होतील. घरात कलह माजेल. राग अनावर होईल बोलण्यात कठोरपणा येईल. व्यापार-धद्यात गुरूमुळे पूर्ण नुकसान होणार नाही. घरासबधी प्रश्न तडजोडीने मिटतील. पत्नीच्या हस्ते काम केल्यास जास्त यश येईल. चंद्राचे भ्रमण ३।४।५ स्थानातून आहे ते बरे आहे. ५।६ तारखाना सरकारी व सहकारी कामात यश येईल. ७।८ तारखाना घरात त्रासदायक घटना घडतील, पण त्यापासून दशमातील गुरू रक्षण करील. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे ज, स, ख, ह, ड या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ ता ५।६।९।१०.

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान कुभ राशीला भोगकारक आहे. बुध-शुक्र-शनी-मंगळ तिसरे, दुसरा रवी, पहिला राहू व नववा गुरु असे राहूशिवाय सर्व ग्रह शुभ स्थानातून आहेत. पराक्रमात वाढ होईल. सरकारी कामात यश मिळेल. थोडे मिळते घेणे भाग आहे स्वभावात चिडकेपणा जास्त येईल. ४२ पुढील व्यक्तीना हा अनुभव जास्त येईल. मूळचा राहू ३।६।११ या घरात असेल तर अचानक प्रसिद्धी व धनलाभ होईल. चद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे ते चांगले आहे. ता. ५।६ सरकारी व सहकारी कामे करा. ता. ७।८ प्रवासाचा योग येईल. त्यात अमाप फायदा होईल. स्ट्रान्सपोर्टचा धंदा करणाराना खूप काम व पैसा मिळेल. विद्याभ्यासात भर पूर यश. सततीचा भाग्योदय होईल. ७।८ तारखा सर्वबाजूनी चागल्या जातील. मानसन्मान, धनलाभ होईल. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे ग, श, म, ट, ठ या अक्षरांनी सुरु असतील त्यानाहो वरीलप्रमाणे फळं मिळतील. सर्व सप्ताह शुभ आहे.

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला प्रवास घडविणारे आहे. पहिला रवी, बुध-शुक्र-शनी-मगळ धनस्थानात, राहू व्ययात, अष्टमात गुरु असे सर्व ग्रह योग-बळात आहेत, पण त्याना स्थानबल नाही. एकटा गुरू पाच ग्रहावर शुभ दृष्टीने पाहतो आहे त्यामुळे सर्व सुरळीत होईल धनस्थानातील चतुर्ग्रहीने भरघोस धनलाभ होईल. लग्नेश अष्टमात आहे व तोच दशमेश आहे यामुळे शारीरिक पीडा व मानहानी सभवते. चद्राचे भ्रमण १।२।३ स्थानातून आहे ते अत्यत चागले आहे. ता ७।८ आपोआप व अचानक धनलाभ होईल सततीकडून सर्वतऱ्हेची मदत होईल. मित्राकडून धनलाभ होईल. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, घ, भ, ह्या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ५।६।९।१०

□ □ □

---

राजहस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649



" मुंबईला लोकलच्या थर्ड क्लासमधून एक दिवस प्रवास करून
आल्यापासून असं काहीच्या बाहीच करायला लागलेत् बघा ... "